म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय खा॰ वा॰
दा. क्र १२००

BVBK-0401200

## मनोगत :-

आज मी नाट्य रसिकांच्या हाती 'डाकू विक्राळसिंग' देत आहे. या नाटकाची थोडक्यांत पार्श्वभूमी अशी- राजू जहागिरदार व शेखर जहागिरदार हे दोघे सख्खेभाऊ एक दिवस राजू आपल्या वडिलांकडे जमिनीची वाटणी मागतो पण ते आज उद्या करतात. यास्तव राजू संधी साधून एक दिवस त्यांचा खून करतो. हेतू हाच की आपण सार्वभौम व्हावं. रक्तानं माखलेला सूरा बेडरुममध्ये झोपलेल्या आपल्या भावाच्या अंगरख्यात लपवून राजू फरारी होतो. खुनाच्या संशयाने शेखर गजाआड होतो. पण आपण दोषी नाही हे त्याला चांगलं कळतं. एक दिवस डोक्यात खून चढतो व शेखर जेलचे गज तोडून व जेलरचा खून करून पळून जातो. राजू इकडे आरामात लोळत असतो. त्याची शालन नांवाची रखेली असते. एक दिवस तिला शेखर गुंडाच्या तावडीतून वाचवतो. तेव्हापासून ती त्याला आपला भाऊ मानते. पुढे शेखर राजू विरूद्ध सूडभावनेनं पेटतो व यांतच डाकूचा जन्म होतो. शालन त्याच्याशी चांगली वागते व प्रसंगी त्याला साहाय्य करते. डाकू विक्राळसिंग या टोपण नांवानं वावरणारा डाकू आपला भाऊ आहे हे राजूला कळत नाही. एके दिवशी राजूचा खून करून करून व शालनला आपलं अधुरं स्वप्न पुरं करायला सांगून शेखर पोलीसांच्या स्वाधीन होतो. माणसाला सूडाचे वेध लागले की तो कसा झपाटून जातो हे यात दिसतं. माझे प्रयत्न कितपत यशस्वी झाले आहेत कळत नाही, पण मला खात्री आहे की, हौशी नाट्य मंडळाकडे या नाटकाचं सोनं होईल. शेवटी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून मी माझ्या मनोगताला पूर्ण विराम देतो.

BVBK-0401200

१७-६-७८

आपला नम्र,
साईदास आपटे.

श्री साईबाबा प्रसन्न

,' डाकू विक्राळसिंग " या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग "हॅपी-स्पोर्ट क्लब चिंबल" या नाटच संस्थेने दिनांक २८।५।७७ रोजी चिंबल येथे सादर केला त्यावेळी त्यात भाग घेणारे यशस्वी कलाकार—

| | | |
|---|---|---|
| राजू जहागिरदार | : श्री. | अच्युत नाईक |
| रंगा पाटील | : ,, | पंढरी खोलकर |
| जिवा | : ,, | भानुदास चोपडेकर |
| कांचनलाल | : ,, | पांडुरंग हडकोणकर |
| भैरव | : ,, | पोपट नार्वेकर. |
| वाघ्या | : ,, | दिगंबर कुंडईकर |
| नगा | : ,, | सदानंद कुंडईकर |
| यम्या बेरड | : ,, | गोविंद कुंडईकर |
| विक्राळसिंग | : ,, | दिलीप कानोळकर |
| शालन | : कु. | रेखा हळणकर |

दिग्दर्शक : श्री अच्युत नाईक — सुभाष घोगळे

प्रमुख पाहुणे : डॉ. सावळो केणी उपाध्यक्ष, कला अकादमी, पणजी-गोवा.
अध्यक्ष : श्री. वामन राधाकृष्ण, उपसंपादक ( दैनिक गोमंतक ).

वक्ते: श्री. रमेश बर्वे, (नाटच परीक्षक)
श्री. तिओतोनिओ परेरा (आमदार)
श्री. उत्तम कुंडईकर (सरपंच)

संगीत: श्री. सोमनाथ च्यारी

तबला: श्री. प्रभाकर आमोणकर

नेपथ्य व रंगभूषा: श्री. महाबळेश्वर मणेरकर

ध्वनी संकलन व प्रकाश : श्री. कारलूश परेरा.

व्यवस्था : हॅपी स्पोर्ट क्लब-चिंबल.

# अंक १ ला

## प्रवेश १ ला

*स्थळ*– राजू जहागिरदार यांच्या बंगल्यातला बैठकीचा दर्शनी भाग समोर बाहेर जाण्याचा दरवाजा. प्रेक्षकांच्या उजव्या हाती स्वयंपाक खोली– डाव्या हाती ड्रेसिंग रुम, बाजूला माडीवर जाण्याचा जिना, भिंती-वर मध्यभागी राजूच्या वडिलांचा फोटो, बाजूला कॅलेंडर, खुंटीला एक चाबुक व बंदुक दिसतेय. सोफा–खुर्च्या–टेबलं. नीट मांडून ठेवलेली आहेत, टेबलावर फुलदाणी आहे. वेळ सकाळची. पडदा उघडतो त्यावेळी रंगमंचा-वर कुणीही नसतं.... बाहेर कुणीतरी आल्याची चाहूल लागते–कुत्र्यांचे भूंकणे ऐकू येते व तशातच रंगा पाटील घाबरत प्रवेश करतो.

रंगा : जहागिरदार ... अहो जहागिरदार ... छे ! नाहीत का हे घरात ? (पुढे येत) श्रीमंत .. अहो श्रीमंत ... (आतून गणा 'आलो–आलो' असं म्हणत धावत येतो )

गणा : हात्तिच्या ! तुमी व्हय ... मला वाटलं जहागिरदारच आले की काय ? काहो ... तुमी लय घाबरल्यावाणी दिसत्यात ... काही इशेष घडलं नाही ना ? म्हंजे म्या आपलं इचारतो !

रंगा : ते सारं नंतर सांगेन मी तुला ... प्रथम श्रीमंत कुठे गेलेत तेवढे बोल.

गणा : अव ह्ये काय इचारणं झालं... ? श्रीमंत कुठं असणार हे तुम्हासनी ठावं नाय... ?

रंगा : अरे ठाऊक असतं तर तुला विचारलं असतं का... ? तसाच परस्पर धावत जाऊन भेटलो असतो त्याना... सांग–कुठं आहेत श्रीमंत ?

गणा : ह्ये बघा काय त्ये.. ? आता तुमी मलाच इचारत्यात ?

**रंगा :** वटवट करू नकोस गण्या. श्रीमंत कुठे गेले तेवढं सांग. बाकी तुम्हा गड्याना इल्ली फार मस्ती चढलीय !

**गणा :** हां पाटील, बोलताना सांभाळून–इचार करूनशान बोला, म्या गडी माणूस असलो तरी त्यो तुमच्यासारख्या पाटलाचा नाही –राजू जहागिरदाराचा हाय– आनि हृचे बघा आमास्नी मस्ती चढली नाय.

**रंगा :** अरे माझ्यावर मोठं संकट आलेलं आहे तुझ्याशी वाद घालीत बसायला मला वेळ नाही. सांग लवकर ... श्रीमंत कुठं आहेत ?

**गणा :** अव असं काय करतायसा तुम्ही ?

**रंगा :** हे बघ–जास्त वात्रटपणा करु नकोस –सांग लवकर

**गणा :** च्छा बुवा ! लई हट्टी बघा तुमी .. अव त्यानी मला सांगितलंय कि कुणालाही माझा ठिकाणा सांगू नकोस. अन् तुमी पुन्हा–पुन्हा काय इचारत्यात मला ? म्या सांगणार नाही. श्रीमंतास्नी कळलं तर पाठीचं चमडं निघल माझ्या

**रंगा :** अरे पण भितोस कां म्हणून... मी नाही त्याना तुझं नांव सांगत– आता तरी सांगशिल की नाही ?

**गणा :** अस्सं व्हय मग सांगतो ... श्रीमंत रातच्या काळोखात शालन नायकिणीच्या माडीवर गेले आहेत.

**रंगा :** अरे मग हे मला सांगायला एवढा घाबरायला कशाला हवं . आणि श्रीमंतानी तरी या बाबतीत एवढी गुप्तता का बाळगावी ? हं आलं लक्षात !

**गणा :** काय म्हनतायसा –?

**रंगा :** अरे तुझ्यासारख्या माणसाना श्रीमंत असल्या खाजगी गोष्टी सांगतीलच कसे? तू कुणाच्याही तोंडावर पटकन बोलून जाशील व श्रीमंताना तोंड दाखवायला शरम वाटेल. म्हणूनच त्यानी तुला तसं सांगितलं .. बरं... मी भेटून जातो त्याना

**गणा :** अव पन त्ये तुमासनी भेटणार नाय

**रंगा :** कां.. ?

**गणा :** त्यानी सांगितलंय कि जर पाटील इथं आले तर त्याना माझा

ठाव ठिकाणा सांगू नकोस–आत्ता तुमीच इचार करा. त्ये तुम्हासनी कसे भेटणार ?

रंगा : अरे शालनची माडी तुझ्या श्रीमंतानाच माहीत आहे असं समजू नकोस अरे आम्ही सुद्धा इष्काचे रंग उधळलेत त्या माडीवर.

गणा : म्हंजी ... तुमी ? आनि कवा ... ?

रंगा : नंतर सांगेन सावकाश कधी तरी ... यावेळी मी संकटात आहे.

गणा : अव, सगळं मुसळ केरात गेलं बघा – काय हो ... अस्सं संकट तरी कोनतं पडलंय तूमच्यावर ? नाय म्हनजे म्या आपला इचारतो.

रंगा : तू यावेळी मला कांहिही विचारु नकोस... येतो. मी. (जायला वळणार तोच बाहेरून राजू जहागिरदार वय ३०।३५ क्रूर वृत्तीचा माणूस–रागीट मुद्रा प्र. क.)

राजू : कोण· पाटील ? सकाळच्या वेळी आणि श्रीमंताच्या बंगल्यावर?

रंगा : येण्यासारखीच वेळ आली म्हणून तर मुद्दाम आलो ...

राजू : ( पुढे येत ) काय झालं ? शेतात पाणी शिरलं की देवळाच्या बांधकामासाठी दगड कमी पडले ?

रंगा : यातलं काहींही झालं नाही श्रीमंत ... मी घरी नाही असं पाहून कुणा चांडाळानं माझ्या बहिणीला...

राजू : काय म्हणतोहेस रंगा ...? तुझ्या बहिणीला भ्रष्ट केली ? अरे पण असं कोणा चांडाळाला एवढं धाडस झालं .. ?

गणा : श्रीमंत .. श्रीमंत . मी सांगू... ?

राजू : चालता हो साल्या इथून ... मी सांगू – ? काय सांगणार आहेस तूं ? तुला माहीत आहे त्या चांडाळाचं नाव ..?

गणा : अवं असलं धाडस करनारा लई चपळ माणूस असाया होवा. नाय म्हनजे म्या आपला बोललो... मला हो काय ठाव त्या दुष्टाचं नाव–पण त्यो लई चपळ असणार एवढं खरं–

राजु : पुरे झाली तुझी हुशारी–आंत जाऊन कामाला लाग.

गणा : अव त्ये काय सांगाया पायजे – आत जाऊन लागतोच की कामाला ... ( जातो )

**राजू :** पण तू कुठं गेला होतास तिला एकटीला सोडून ?

**रंगा :** काय सांगू श्रीमंत —— माझं कर्म ? अहो कधी नव्हे तो आज किर्तनाला गेलो ...

**राजू :** तू किर्तनाला गेलास अन् इकडे तुझ्या बहिणीनं तमाशा केला. तू आलास केव्हा घरी —?

**रंगा :** रात्री एक वाजता — कमल दारातच उभी होती. भेदरलेली कासावीस झालेली. मला पाहताच ओरडत येऊन मला बिलगली. साश्रू नयनानी तिनंच मला सारी हकीगत सांगितली. मी वेडा झालो. त्या चांडाळाचा सूड घ्यायचा ठरवला. पण तो कसला मिळतोय मला. रात्रभर रडून काढली त्याच्या नावानं आणि आज तुमच्याकडे धाव घेतली.

**राजू :** तुला कुणाचा संशय येतोय ?

**रंगा :** नाही म्हणायला संशय ठेवण्यासारखी एक व्यक्ती आहे. पण त्याचं नांव घेतलं तर तुम्हाला राग येईल कदाचित.

**राजू :** मुळीच नाही. अरे ज्यानं तुझ्या बहिणीचं शील भ्रष्ट केलं त्या चांडाळाचं नुसतं नाव सांग — नाही त्याचा मुडदा पाडला तर नावच सांगणार नाही जहागिरदाराच्या घराण्याचं सांग कोणत्या माणसाचा तुला संशय येतोय ?

**रंगा :** पण तोच असला तर ठीक न पेक्षा चोर सोडून संन्याशी सुळावर जायचा.

**राजू :** पण त्याचं नाव तरी सांगशील की नाही.

**रंगा :** त्याचं नाव तुम्हाला सुद्धा माहित असेल.

**राजू :** ( आठवून ) छे ! मला नाही आठवत त्याचं नाव ... जाधवाचा दिलप्या ?

**रंग: :** छे — छे — तो देवमाणूस !

**राजू :** पवाराचा मंगेश ?

**रंगा :** नव्हे — तो सुद्धा त्याच्याच बैठकीला बसणारा.

**राजू :** नाही बुवा मला सांगता येत.

**रंगा :** सांगू ?

राजू : सांग.

रंगा : पण मला सांगायला भिती वाटते श्रीमंत.

राजू : अरे भितोहेस तरी कुणाला तू ?

रंगा : तुम्हाला – कारण तो तुमचा ...

राजू : काऽय ? म्हणजे ... समजलो नाही मी ...

रंगा : श्रीमंत – ज्यानं परवाच्या दिवशी रात्री दौलतरावांच्या मुलीला जत्रेतून पळविली – त्याचाच संशय येतोय मला.

राजू : म्हणजे शेखरचा. होय ना ?

रंगा : होय मला वाटतं ...

राजू : अरे, मग ही बातमी भीत भीत कशाला सागतोहेस तू ? शेखर माझा सख्खा भाऊ असला तरी त्याला मी कवडीचीही किंमत देत नाही. चार वर्षापूर्वी स्वतःच्या जन्मदात्या बापाचा खून करून पळालाय तो. त्या दिवसापासून या घराला तो अंतरलाय. त्याचा इथं कुणीही नाही. पण कालच मला कुणीतरी म्हणाला की शेखर दिल्लीला गेलाय.

रंगा : मला वाटत नाही तो दिल्लीला जाईल ! तो याच गावात कुठंतरी असला पाहिजे – कारण दौलतरावांच्या मुलीचं प्रकरण परवाचंच आहे.

राजू : माझाही तोच कयास आहे. तो इथंच कुठंतरी असणार.

रंगा : इथं ?

राजू : म्हणजे याच गावात –साला मिळाला असता तर– एकाच गोळीनं यमसदनास पाठविला असता. आज चार वर्षे झाली तरी पोलीस खात्याला त्याचा मागमूस लागत नाही. जंग जंग पछाडून हैराण झालेत बिचारे ... त्यानंच तुझ्या कमलचं शील भ्रष्ट केलंय म्हणतोस ?

रंगा : मी फक्त संशयानं बोलतोय. तोच होता की आणखी कुणी दुसरा ते कसं कळणार ?

राजू : तोच असला पाहिजे ...

रंगा : पण श्रीमंत, जर तोच असला तर ...?

राजू : तर – तर – काय तो मेलाच म्हणून समज. उद्या आम्ही दौलतरावांच्या वाड्यावर गुप्त बैठक घेणार आहोत. आणि त्यानंतर एक ठराव पास करणार.

रंगा : कोणता ठराव ?

राजू : शेखरला शोधून काढण्यासाठी पोलिसाना सहाय्य करायचं. तो जिथं असेल तिथून मुसक्या बांधून सरळ अंधार कोठडीत डांबून ठेवायचा — काही दिवस अन्न-पाण्यावाचून त्याला तडफडत ठेवून नंतरच खुनाच्या सुनावणी-साठी कोर्टात उभा करायचा ( बाहेरच्या दरवाजातून एक पुडी भिरका-वल्यागत दोघांच्यामध्ये पडते )

रंगा : ( दचकून ) अरेच्या ! ही काय भानगड ?

राजू : काय आहे त्या पुडीत ? उचल बघू. ( रंगा पुडी उचलून देतो, आत पत्र असतं, राजू ते वाचू लागतो ) राजू जहागिरदार यासी, ... मी आपणास आगाऊ सूचना देत आहे की, उद्या रात्री ठीक १२ वाजता जाईच्या माळरानावर पंचवीस हजार रुपयांची थैली घेऊन आपण माझ्या भेटीस यावे. हयगय झाल्यास विपरीत परिणाम होईल. दुसरी गोष्ट अशी की या गोष्टीचा कुठेही बोलबाला होता कामा नये. झाल्यास तुझ्या जीवा-वर बेतेल एवढं ध्यानात ठेवावं. अच्छा न विसरता उद्या रात्री जाईच्या माळरानावर पंचवीस हजारांची थैली घेऊन माझ्या भेटीस ये. मी तुझी वाट पहात आहे. — डाकू विक्राळसिंग.

## प्रवेश २ रा.

स्थळ : गावाबाहेरचा एक रस्ता. वेळ संध्याकाळची. डाव्या बाजूनं जिवा गारुडी प्र.क. वेष गारुड्याला साजेसा,बरोबर एक बंद परडी व हातात पुंगी रस्त्याच्या मध्यावर येताच बसतो व चंची उघडून पान खाऊं लागतो—

जिवा : ( सुपारी कापीत ) अजून किती लांब आहे कुणाला ठाऊक त्यां जहागिरदाराचं घर . दिवस मावळतीला झुकतोय तस छातीन धडधडा-यला लागतंय. जातीवंत काळ सर्पांना चालता चालता पकडून परडीत घालता, पण त्या जाईच्या माळावरल्या काळ सर्पाचं मात्र भलताच भय

वाटतं बुवा आपणाला (सुपारी खातो) च्या आयला परवातर साली मोठीच पंचायत झाली. जाधवांच्या शेतावर सर्प पकडायला गेलो...आणि अचानक त्या डाकूच्या हाती सापडलो . (पान खातो... तंबाखू तोंडात घालत) पण साला तो डाकू माझ्यावर कां डाफरतो ते वेताळाला माहीत मी म्हणे जादू करुन त्याला पकडणार आहे ...साल्या जादूनं जर बडे–बडे डाकू मरतात, तर सरकारला आमची केवढी गरज भासली असती – मिसा लावायची काहीच गरज नव्हती ...( दुसऱ्या बाजूला पहात ) हात्तिच्या, हा कुठं जातोय डाकूचा साथीदार तर नव्हे ना ? ( उठतो )

कांचनलाल : ( प्र. क. ) अरे मारो बाप ! हा आणि कोण रस्त्यात ... साला डाकूची साथीदार तर नाय ( पुढे येत ) तुमची नाव काय हो ?

जिवा : माझं होय–मला जिवा गारुडी म्हणतात . .मी जादू–टोणे करतो· जिवंत सर्पांना हातात धरतो–गळ्यात देखील घालतो.

कांचलाल : हाय मेरे बाप ! तुमी सर्वांना हातामंदी धरते...

जिवा : अरे बाबा सर्वांना नव्हे सर्पांना–नागाना–नागाना...

कांचनलाल : तीच ती. नांव काय म्हनाली..?

जिवा : जिवा गारुडी

कांचनलाल : अरी जिवा . साली मसनी ओळख दाखवत नाय काय तूं ? ओळखली आमाला ?

जिवा : नाही बाबा कोण आहेस तू ?

कांचनलाल : साली अशी काय करते जिवाभाय – आमाला वळखत नाही अशी कोण बी नायी .. आमाला कांचनलाल म्हणते. तुला मी चांगली ओळखते – गेल्या वर्साला तू पंढरपूरला नाय गेली हुती ?

जिवा : मी दरवर्षी आषाढी – कार्तिकी करतो. वर्षभर केलेलं पाप चंद्र-भागेत धुवून टाकलं म्हणजे जिवाला फार बरं वाटतं – पण तू कुठं पाहि-लंस बुवा मला त्या गर्दीत ?

कांचनलाल : अरी बाबा जशी तुमी तुमची पापं चंदरभागेत धुते तशी साली आमी बी धुते–आमी सुद्धा वरसभर पापच करते.

जिवा : पाप ? आणि...तू करतोस ?

कांचनलाल . जिवाभाय आमी लोकाना पिशा देते आनि आमच्या डायरी-वर पांचाची पन्नास करुन ठेवते–शमजली–अरी पण तू काय करते वरसभर त्ये नाय सांगितली.

जिवा : अरे पैंसा मिळवण्यासाठी या जगात निरनिराळी सोंग, ढोंग करावी लागतात माणसाला. आम्ही जादू करुन अमक्या तमक्याला मारतो किंवा वेडा करतो असं सांगून भोळ्या लोकाकडून भरपूर पैंसे घेतो.

कांचनलाल : म्हंजी तुमी लोकास्नी जंतर मंतर फू करून साली मारुनशान टाकते ? आ रा रा ! म्हंजी तू बी शाली डाकू शारकीच मानूस हायस

जिवा : छेरे माझ्या दोस्ता – मी लोकाना फसवून माझं पोट भरतो खरा पण मी जंतर करत नाही आणि मंतरही मला येत नाही. उगाच काहीतरी बडबडायचं आणि लोकाना फसवायचं – माझ्या जादूनं अजूनपर्यंत कुणीच दगावला नाही–आणि यापुढे ही दगावणार नाही.

कांचनलाल : अशी म्हणते काय–

जिवा : पण काय रे, पंढरपूरला तूं कुठं पाहिलंस मला ?

कांचनलाल : चंदरभागीच्या वांळवंटात. सर्वांना नाचवताना.

जिवा : सर्वांना नव्हे–सर्पांना

कांचनलाल : तीच ती–पण जिवा, रातीच्या वक्ताला तूं कुठं जातीस? अरी बाबा गावामंदी साली डाकूचा सुळसुळाट झालीय. त्येंची वाटंला नाय गेलो तरी ती बांधून नेते. आमाला शाली भीती वाटते त्या डाकू लोकांची–चला आमी जाते.

जिवा : दोस्ता – अरे पण तू कुठे जातोहेस–?

कांचनलाल : त्या शाला झागिरदारानं बोलावली हाय. काय काम त्ये त्या डाकोरजीला म्हायत. बर येते आमी – येळ झाली तर साली रागावेल आमचं वर.

जिवा : अरे पण मी सुद्धा तिकडेच यायला निघालोय वाट माहित नाही म्हणून रस्त्यावरच बसलो पान खात, चल–मला सुद्धा जहागिरदारानी बोलावलंय

कांचनलाल : अरी पन ह्या सर्वांना घेऊन तू कशाला येती तिकडे ?

जिवा : सर्वांना नव्हे, सर्पांना

**कांचनलाल :** तीच ती .. पन त्यासनी कशाला, साली च्यावली तर आमी मरुन जायेल—आनी आमची बायडी रांडवी व्हयेल—

**जिवा :** घाबरु नकोस रे दोस्ता— परडी माझ्या हातात आहे. शिवाय ती पक्की बांधलेली आहे. सापाना आम्ही घरात नाही सोडत. त्याना खेळवायचे रस्त्यावर—सोडू ? पहाणार आहेस त्यांचा खेळ—?

**कांचनलाल :** (घाबरत) मारो बाप—मारो डाकोरजी— जिवाभाय सोडू नको सर्वांना—आमाला च्यावेल— (इकडे—तिकडे, धावतो ) आमची बायडी रांडवी व्हयेल – तुमास्नी डाकोरजीची कसम हाय – सर्वांना सोडू नका—आमाला शाली भय वाटते—

**जिवा :** अरे दात काढलेल्या सर्पांना तू एवढा भितोस ? कँमाल आहे बुवा तुझी – अरे लहान—लहान पोरांच्या गळ्यात आम्ही सर्पांना हाराप्रमाणे घालतो ( त्याच्या गळ्यात हार घातल्यासारखा बहाणा करतो )

**कांचनलाल :** (चार हात पळत) मारो—बाप—मारो—माझी डाकोरजी नाय नाय—तुमी आमची मैतर नाय, आमी पंढरपूरला गेली नाय—साली तुमाला पायली नाय, आमी—साली खोटी बोललो (स्वत:च्या तोंडात मारुन घेतो) ही बघा आमी शाली आमालाच मारली—आमी जाते भाय—पन तुमी सर्वांना सोडून आमची धांदल करु नका

**जिवा :** आतां नाही बाबा मी तुझ्या वाटेला जात—तू मुलखाचा भितरा आहेस—पण माझं एक काम करशील ? मी तुला त्या मोबदल्यात चार मंत्र शिकवतो

**कांचनलाल :** काय म्हणाली? आमाला तुमी मंतीर शिकविते?— शाबास ! आरी मग आमाला बी तुमच्या सारखी पिशा मिळेल

**जिवा :** पण त्या मोबदल्यात माझ एक महत्वाचं काम तू करायला हवंस... सांग करशील ना ?

**कांचनलाल :** कोणती कामे .. साली सांग तर खरी

**जिवा :** मला त्या माडीवर जाण्याची वाट दाखवशील का ?

**कांचनलाल :** मांडीवर ... कुनाच्या ?

**जिवा :** अरे बाबा मांडीवर नव्हे ... मा डी व र ...

**कांचनलाल :** अश्शी व्हय ... आमी समजली मांडीवर ... जिवाभाय अरी पन कुनाच्या माडीवर आनि कशाला ?

**जिवा :** थोडसं खाजगी काम आहे माझं ... तू फक्त मला मार्ग दाखव पुढचं सारं मी पाहतो.

**कांचनलाल :** साली जिवा . तुझी बायडी नाय काय घरामंदी ?

**जिवा :** अरे आम्ही फिरते माणूस ... बायकाना बरोबर घेऊन कसं होणार ? त्यापेक्षा ...

**कांचनलाल :** अस्सं व्हय ... पन जिवाभाय, ती साली पचास रुपीया घेणार – तुझीकडं हायत का एवढी पिसा ?

**जिवा :** अरे तुझ्यासारखा शेठ दोस्त असताना पैशाना काय तोटा आहे – जमलंच तर आत्ताच देऊन टाक मला पन्नास रुपये .. उद्या एकाचा संमंद काढायचा आहे – त्यानं शंभर रुपये द्यायचे कबूल केले आहेत मला.

**कांचनलाल :** साली आमची पिसा आनि मांडीवर तू जानार ? पण माझी पिसा कधी देणार ?

**जिवा :** उद्या याचवेळी, याच जागेवर–(डाव्या बाजूनं शालन वय २०।२१ –प्र. क.)

**कांचनलाल :** जिवा भाय आली. . .मांडी आली ... तुमची साली मांडी आली ...

**शालन :** ए–मारवाड्या–मांडी कुणाला म्हणतोहेस ? मी मांडी आहे का ... ? पुन्हा असं बोललास तर माडी करीन.

**कांचनलाल :** बाई आमी रागामंदी नाय बोलली. साली रागावली काय आमचीवर ? अव तुमचीसाठी आमी- साली गिऱ्हाईक बघूनशान ठेवली

**शालन :** फुकट पाहाणार आहेस वाटतं गिऱ्हाईक. चांगले पंधरा रुपये मोजून नाही घेत तू प्रत्येक वेळी ?

**कांचनलाल :** बाई आमी नाय म्हणाली तुमाला ?

**शालन :** कोणतं गिऱ्हाईक पाहून आला आहेस? चांगला पैसेवाला साहेब आहे ना ? नाहीतर येशील घेऊन रस्त्यावरच्या बैराग्याला.

**कांचनलाल :** अव तुमाला पिशा मिळाली की झाली.

शालन : बोल – कोण येणारेय आज माझ्या माडीवर ?
कांचनलाल : ह्यो काय तुमच्या नाका म्होरं उभी हाय – साली जिवा अरी बोलना हिचीवर . . . मांडीवर तू जानार आनि तोंड शाला आमची चालू.
जिवा : तूंच कर सौदा ... पुढचं सगळं मी पहातो.
कांचनलाल : च्छा बा .... ! जिवा भायनी शाली सगळी आमचीवर शंपवली .... ठिक हाय .... शालन बाय–ह्यो जिवा गारुडी आज तुमची मांडीवर येणार हाय म्हनते ....
जिवा : अरे बाबा मांडीवर नव्हे माडीवर
कांचनलाल : तीच ती .... तवा किती पिशा घेनार शालन बाय .... ?
शालन : शंभर रुपयात एक पै देखील कमी नाही . .
जिवा : चालेल .. एकशे पंचवीस घेतलेस तरी चालतील
कांचनलाल : मारो डाकोरजी ! शाला आमच्या खिशावर गदा आली.
जिवा : (पुढ येत) तुमच्या तोंडून एखादं मंजूळ गाणं ऐकेन म्हणतो–
कांचनलाल : च्याआयला ह्यासनी गाना सुचली . मारो डाकोरजी.
शालन : ऐकणारच आहात तुम्ही गाणं. ऐका तर ( जिवाचा हात हातात धरून गाणं म्हणते– कांचनलाल बेचैन होतो. पुन्हा-पुन्हा आपल्या खिशाला हात लावून पाहातो शालन रंगात येवून गाणं गाते -

पद

साजणा मजला तुमचा म्हणा
हो ऽ . मजला तुमची म्हणा ॥ धृ ॥
चला जावूया माडीवरती
करीन प्रीत मी तुमच्यावरती
गोंजारून घ्या मजला आरती
एकदाच आपुली म्हणा । १ ॥

( गाणं संपताच त्याच्या हाताला धरुन त्याला घेऊन जाते. मागून कांचनलाल जातो.

## प्रवेश ३ रा.

स्थळ : राजू जहागिरदाराची बैठकीची खोली – वेळ संध्याकाळची. राजू अस्वस्थपणे फेऱ्या मारतोय – बाहेरून गणा प्र. क.

राजू : (रागाने) पत्ता लागला की नाही जिवा गारुड्याचा ?

गणा : अव त्यो येतच नाय म्हनत हूता . . . पन म्या दम दिला तसा येतो म्हनाला ... अव सगळंच इपरित व्हाया लागलंय बघा – कोण कवा कुठ जायल त्येचा पत्त्या बी लागनार नाय.

राजू : म्हणजे बोलण्याचा अर्थ काय समजावा मी .... ?

गणा : अव अर्थ कसला—आनी काय कसलं ?

राजू : असा कोड्यात बोललेला मला सहन होणार नाही हं गण्या.तुला इथ राहायच असेल तर रहा, नपेक्षा दुसरीकडे आपली सोय बघ ....

गणा : ह्यें बघा काय त्यें - अव म्या आपला साधा माणूस, अव माझ्यावर तुम्ही एवढे कशापाय रागावता ? समदं सांगतो तुम्हासनी.

राजू : मग सांग तर लवकर

गणा : अव त्यो आपला . . .

राजू : कोण आपला ?

गणा : अव त्यो . . . आ . . प . . ला . .

राजू : (रागाने) अरे कोण आपला ....

गणा : त्यो ... हो . त्यो आपला ...

राजू : कानफाटांत देईन हं ठेवून .... सांग लवकर .... कोण आपला

गणा : आपला त्यो हो .... गारुडी .....

राजू : जिवा गारुडी ना ?

गणा : हां--हा-- जिवा का शिवा कोन त्यो ....

राजू : त्याचं काय झालं .... ?

गणा : त्यो तिकडे गेला ...?

राजू : तिकडे म्हणजे कुठे——

गणा : माडीवर .... तुमी कालच्या राती गेला होता ना तिथं.

जिवा : काय–जिवा गारुडी शालनच्या माडीवर .. कसं शक्य आहे ?

गणा : आता हो ! अव पैसा असल्यावर काय शक्य नाय ..- ?

राजू : अस्सं काय ! ठिक आहे येवू दे त्याला इथं–साल्याला फोडून काढतो हंटरनं–शालन वेश्या असली तरी तिला मी माझी रखेली म्हणुन सांभाळ-लीय–पर पुरुषाचं तोंडसुद्धा पाहाणार नाही असं वचन दिलंय मला तिनं. शालनला निरोप सांगितलास की नाही ...

गणा : हे बघा काय त्ये -- अव शालनला निरोप द्याया गेलो हुतो तवाच तिथं मला जिवा गारुडी भेटला --- आनि श्रीमंत, त्यो कांचन मारवाडीही तिथं होता.

राजू : कांचन मारवाडीही तिथं होता - ?

गणा : आता म्या खोट कशापाई सांगेन.

राजू : त्यालाही बोलावलाहेस की नाही - ?

गणा : समद्यासनी बलावलंय --- आता कोण येत्यात ते पाहूया.

राजू : अगोदर शालनलाच फोडायला हवी आणि नंतर त्या दोघाना. गणा, तू आंत जा-

गणा : स्वयंपाक कराया लई येळ हाय . . म्या इथंच थांबतो थोडा येळ तुमी जिवासनी मारा, म्या मारवाड्यासनी पिटतो. तुमाला राग येईल तर म्या आपला आंत जातो– म्या येडपट मानूस काहीतरी बोललो झालं . .

राजू : माझं डोकं जास्त संतापवू नकोस . . . तूं मुकाट्यानं आंत जा. तू सुद्धा हल्ली जास्तच सुधारलाहेस. दिवसें दिवस तुझी पायरी तुला नीट दिसेनाशी झालीय. जा चालता हो आंत. गरज भासलीच तर मी हाका मारीन तुला . . .

गणा : अव असं काय बोलतायसा श्रीमंत . . . अव माणसानं माणसाला मदत करायची नाय तर कोण जनावर करणार ?

राजू : एक वेळ जनावरं परवडली पण तुमच्यासारखे बैलोबा काय कामाचे?

गणा : आता अगदी सरळ बोललात बघा - अव शेवटी मानूस काय किंवा बैल काय – दोघेही सारखेच – बरं – जातो म्या. गरज लागल तवा बैलाला बोलवा म्हंजी झालं – (जातो)

**राजू :** शालननं माझा विश्वासघात तर केला नाही ना ? छे ! शालन तरी तसं करणार नाही . . आणि तसं असलं तर – तर शालन या जगात जिवंतच राहणार नाही. कुत्र्याच्या मौतीनं तिला मारून टाकीन मी, ( बाहेर पहात ) पण – तिघापैकी अजून एकाचाही कसा पत्ता नाही ( बाहेरून कांचनलाल लगबगीनं प्र. क. ) (त्याच्याकडे पहात क्रोधानं) एवढा वेळ कुठं होतास रे मारवाड्या – किती वाजता बोलावलं होतं मी तुला आणि तो पुंगीवाला कुठं आहे ?

**कांचनलाल :** आमाला त्येची माहिती नाय झागिरदार. आमी आपली शरळ इकडे आली . . थोडी येळ मातर झ्याली सार्ली. आमच्या बायडीने तरास केली.

**राजू :** काय केलं तुझ्या बायकोने ?

**कांचनलाल :** (रडत) साली तिच्या हाताची बोट कापली तांबडा तांबडा रगत गेली पसाभर . . धावत-धावत आमी डागदरला आणली म्हणून आमाला श्रीमंताकडी याया येळ झाली.

**राजू :** (रागाने) मारवाड्या, सत्य काय आहे ते नाही सांगितलंस तर हंटरनं पाठीची चामडी फोडून काढीन समजलास ? सांग कुठं होतास एवढा वेळ .. ?

**कांचनलाल :** आमी डाकोरजीची कसम घेऊन शान खरी खरी बोलते. तुमाला खोटी सांगितली तर डाकोरजी अमाला मारेल–खरीच माझ्या बायडीची बोट कापली

**राजू :** ( हंटर काढून ) मारवाड्या, फटकारा बसायच्या अगोदर खरं काय ते सांग.

**कांचनलाल :** मारो माझी डाकोरजी ! तुमी अशी काय करते ?

**राजू :** (फटकारा मारीत) बोल कुठं होतास ?

**कांचनलाल :** (ओरडत) नाय-नाय झागिरदार आता नाय आमी खोटी बोलते . . खरी तीच सांगते.

**राजू :** मग सांग-कुठं होतास एवढा वेळ ?

**कांचनलाल :** बायडीच्या हाताची रगत पुशीत हुती . . डाकोरजी शपथ.

राजू : (मारतो) साल्या बोल. जोपर्यंत तू खरं सांगत नाहीस तोपर्यंत तुला अस्सा मारणार मी (मारतो–तो ओरडतो) साल्या माझ्याशी खोटं बोलतोहेस काय ?

कांचनलाल : मारो बाप-मारो माझी बायडी–हाय –हाय, तुमी शाली आमची पाठच फोडून काढते शान–

राजू : (मारीत) मग सांग लवकर

कांचनलाल : शांगते–शांगते --- पन आमाला मारू नको – तुमासनी डाकोरजीची शपथ हाय–

राजू : नाही मारीत – मग सांग तर लवकर.

कांचनलाल : (घाबरत) आ – आ, मी – शा, . . . शाली –

राजू : (मारीत) आ – आ काय करतोहेस. नीट सांग.

कांचनलाल ( कासावीस होत ) आमी – शाली – शालन बायच्या मांडी-वर हुती.

राजू : आणखी कोण होता तुझ्याबरोबर ?

कांचनलाल : ती साली जिवा गारूडी आमची साली शंभर रुपीया गेली. जिवा साली खोलीमंदी गेली आणि आमी साली भायर रायली

राजू : आता जिवा गारुडी कुठं आहे ?

कांचनलाल : येल आता. त्यो अनी मी साली कवाची रोडवर आली. आमी पुढे चालली ती साली मागून होती.

राजू : शालनची माडी कुणी दाखवली जिवाला ?

कांचनलाल : ती साली शालन आली आनी जिवाच्या हाताला धरुन शान गेली–त्याची बोलणी पयल्यांदाच झाली हुती–

राजू : मग तूं का गेला होतास त्याच्या मागाहून ?

कांचनलाल : साली शंभर रुपीया आमी दिली आणि शालनबायच्या माडीवर गारुडी गेली–साली आमची शंभर रुपीया गटारामंदी गेली. (बाहेरुन जिवा व शालन येतात) ही बघा बाय आली–

राजू : शालन, तुं आमची गुन्हेगार आहेस. तुला आज मी कडक शासन द्यायचं ठरवलंय

**शालन** : मला आणि कडक शासन ? का म्हणून ? कोणता गुन्हा केलाय मी – श्रीमंतांचा ?

**राजू** : सटवे लाज नाही वाटत सांगायला – जिवा गारुड्याबरोबर माडीवर इष्काचे रंग उधळायला शरम कशी वाटली नाही तुला ?

**शालन** : पण श्रीमंत ... ह्या गोष्टीवर तूम्ही विश्वास ठेवता, अहो खात्री करायची असेल तर जिवाला समोर उभा करून विचारा.

**राजू** : काय विचारु– ? स्वर्गीय आनंद कसा लुटलास म्हणून विचारु ?

**शालन** : चुकताहां तुम्ही श्रीमंत... तुम्ही जो संशय घेतलात तो निखालस खोटा आहे-कुणी सांगितलं तुम्हाला मी जिवाबरोबर इष्काचे रंग उधळीत होते म्हणून–या मारवाड्याने ना ?

**कांचनलाल** : व्हय, व्हय–आमी सांगितली– आता तुमी खोटी बोलनारच आमची साली शंभर रुपीया तुमच्या मांडीवर गेली.

**राजू** : मारवाड्या– तू काहीच बोलू नकोस–सारी कल्पना आलीय मला. तुं यावेळी जा इथून. गरज लागेल त्यावेळी निरोप पाठवीन तुला.

**कांचनलाल** पण साली आमची शंभर रुपीया... ए गारुड्या माझी शंभर रुपीया देवून टाक - आमी जाते.

**जिवा** : आपल्या मागणीचा आम्ही अवश्य विचार करू. तू आता जा. भेटून जाईन पुन्हा कधीतली, खिशांत पैसे मात्र ठेव.

**कांचनलाल** : साली आता आमी नाय फसते आमची पंभर रुपीया गेली, शाली शालन बायच्या मांडीवर गेली. ( बडबडत निघून जातो )

**राजू** : जिवा – खरं सांग साल्या – शालनच्या माडीवर काय करीत होतास ? सत्य नाही वदलास तर बंदुकीच्या गोळीनं – जागच्या जागी गारद करीन तुला – आणि या शालनला देखिल – सांग उघड तोंड –

**जिवा** : श्रीमंत – मी यःकश्चित गारुडी – गरिब माणूस ! मला कशाला हव्यात असल्या गोष्टी. खरंच आम्ही सध्या गावात धुमाकूळ घालणाऱ्या विक्राळसिंगाबद्दल बोलत होतो. नाही का ग शालन बाई ?

**शालन** : हो ना,– गावात एवढा धुमाकूळ चाललेला असताना आम्ही माडीवर स्वस्थ बसू ... ? श्रीमंत खरंच आम्ही डाकू विक्राळसिंगाबद्दल बोलत होतो

दिवसे दिवस आमच्यासारख्या तरुण पोरी गावात राहायची सोय राहिली नाही. काल रंगा पाटलाच्या बहिणीची अब्रू घेतलीन त्यानं. परवाच्या दिवशी दौलतरावाच्या मुलीला भर जत्रेतून पळविली. मग तुम्हीच सांगा श्रीमंत–अशा दुष्ट राक्षसांचा बंदोबस्त नको, का करायला ?

राजू : सखे माझ्याशी दगाबाजी करतेस काय ? मला वचन देऊन दुसऱ्याशी प्रेमाचे चाळे करतेस, थांब आता तुला गारदच करतो ( खुंटीची बंदूक काढून तिच्यावर नेम धरतो. चाप ओढणार एवढ्यात बाहेरून डाकू विक्राळसिंग प्र. क. बंदूक रोखून )

विक्राळसिंग : ए खबरदार जहागिरदार, मुकाट्यानं बंदूक जागच्या जागी ठेव. नपेक्षा बंदूकीसह हात कलम केला जाईल.

राजू : (घाबरुन) कोण ?–कोण आहेस तूं ... ? (बंदूक आवरतो)

विक्राळसिंग : ( हंसत ) गरिबांचा कैवारी, आणि तुझ्यासारख्या बलाढ्य श्रीमंताचा कर्दन काळ ... डाकू विक्राळसिंग. ( पुढे येत ) आज रात्री बारा वाजता जाईच्या माळरानावर भेटणार आहेस की नाही– ? बोल न पेक्षा इथंच संपवतो भरलेली बंदूक–

राजू : पण - पण – एवढी – रक्कम ---

विक्राळसिंग : अरे ही कसली नामूली रक्कम - पुढे इथली सारी गुप्त भुयारे उखडून काढणार आहे मी – आज रात्री ठीक १२ वाजता जाईच्या माळरानावर नाही भेटलास तर उद्या या तुझ्या प्रचंड बंगल्यावर डाकू-विक्राळसिंगाची धाड पडलीच म्हणून समज. ( अंधार–पडदा )

## प्रवेश ४ था.

स्थळ: जाईच्या माळरानावरील मोकळा माळ --- वेळ रात्री बाराची डाकू विक्राळसिंग खडकावर एक पाय ठेवून कुणाची तरी वाट पहातोय जवळ वाघ्या उभा आहे– –

वाघ्या : सरदार–मध्यान्ह रात्र होत आली तरी अजून भैरवाचा पत्ता नाही.

काही दगाफटका तर केला नाही ना गावकऱ्यानी ? मेलेल्या जनावरावर जसं गिधाडाचं सूक्ष्म लक्ष असतं तसं भवानवाडीतल्या गांवकऱ्याचं आमच्यावर बारीक लक्ष आहे.

**विक्राळसिंग :** वाघ्या, तूं असा शेळपटासारखा कां बोलतोस .... अरे हा डाकू–विक्राळसिंग कुणाच्याही बापाला भित नाही समजलास, बड्या–बड्यांच्या वाड्यावर डाके घालून त्याना नेस्तनाबूत कसे करतो हे पाहात नाहीस का तूं ... ? भय हा शब्द माझ्या आयुष्यात नाही वाघ्या ... डाकूचं जीवन जगणं म्हणजे साधी सोपी गोष्ट नाही ... हे जीवन म्हणजे सतीचं वाण आहे. अरे, ज्या दिवसापासून माझ्यांतला डाकू जागा झाला त्याच दिवशी भय आणि आळस या दोन गोष्टोना तिलांजली दिली मी. भैरव आणि तूं किती शूर आहांत हे चांगलं माहीत आहे मला आणि म्हणूनच मी तुम्हाला माझे साक्षीदार केलेत. भैरवाच्या अंगात भारी ताकद आहे. प्रसंगी पांच-दहा गांवकऱ्याना जेरीस आणील तो चालता चालता. आणि तू त्या शेळपट गावकऱ्यांच्या गोष्टी मला सांगतो आहेस.

**वाघ्या :** जरी झालं तरी सद्याचे दिवस फार खराब आहेत सरदारजी –

**विक्राळसिंग :** याहीपेक्षा खराब दिवस पाहिले आहेत या विक्राळसिंगनं. आठ आठ दिवस दऱ्याखोऱ्यातून जीव मुठीत घेऊन राहिलोय मी– व्ररतीचं अंथरूण अन् निळया भोर आकाशाचं पांघरूण करून आयुष्याच्या घटका घालविल्याहेत --- हे कसले खराब दिवस म्हणतोहेस तू वाघ्या ...

**वाघ्या :** परवाची गोष्ट मी विसरलो नाही सरदारजी --- त्या बिबट्या वाघाला तुम्ही कसा चालता–चालता पकडलात ... किती चवताळलेला होता तो त्यावेळी. तो तुमच्या अंगावर झेप घेणार एवढ्यात तुम्ही त्याचा जबडा पकडलात --- बिचारा बोल – बोल म्हणतां रक्त ओकला . . आणि शांत झाला .

**विक्राळसिंग :** हो ना, मग त्या शेळपट गावकऱ्याना मी घाबरेन असं वाटतंय का तुला ? अरे जेवढी ताकद माझ्यात आहे तेवढीच ताकद तुम्हा दोघात आहे वाघ्या.

**वाघ्या :** पण भैरव येव्हाना यायला हवा होता.

**विक्राळसिंग :** अरे त्याची कामगिरी अत्यंत दक्षतेची आहे. जहागिरदाराच्या बंगल्यात काय खलबतं चालताहेत ती पाहाणार आहे तो. बंगल्याच्या बाहेर रात्रीचा कुणी सहसा फिरकणार नाही–पण कदाचित कुणी दिसलाच तर त्याला अत्यंत चपळपणे लपलं पाहिजे. जहागिरदार सांगितल्याप्रमाणे आज पंचवीस हजार रुपयांची थैली घेऊन येणार. पुन्हा त्याला जातीनं जाऊन सूचनाही केलेली आहे. मोठा वस्ताद माणूस आहे तो–कपट कारस्थानं करण्यात एक नंबर-पण वाघ्या तुला एकच सांगतो-जर राजू जहागिरदार पंचवीस हजार रुपयांची थैली घेऊन सांगितल्याप्रमाणं आज माझ्या भेटीस आला नाही–तर मात्र उद्या त्याच्या बंगल्यावर डाका हा निश्चितच समज. डाकूचं जीवन जगत असल्यापासून मी मनात आणलेली एकही गोष्ट वाया घालविली नाही. आणि त्यातून हा जहागिरदार तर माझा कट्टर दुष्मन --- दिलेल्या शब्दाला जागला तरच वाचेल कदाचित. न पेक्षा त्याचंही मरण अटळ आहे. डाकू विक्राळसिंग म्हणजे काय ताकद आहे तेच दाखवायचं आहे त्याला.

**वाघ्या :** ( दूर पहात ) सरदारजी – कुणीतरी येताय या बाजूनं पण भैरव नव्हे --- ( पहात ) कोण बरं असावा तो ..

**विक्राळसिंग :** नीट पहा न पेक्षा पुढे सरून अंदाज घे .. जहागिरदार यायची वेळ झालीय ...

**वाघ्या :** (पहात) सरदारजी–सरदारजी .... येणारी कुणी तरी बाई माणूस दिसते.

**विक्राळसिंग–** एवढ्या रात्री जाईच्या माळारानावर आणि बाई माणूस ? आश्चर्य आहे ! पण वाघ्या, तू मात्र फार दक्ष रहा— काही कमी जास्त दिसलंच तर–

**वाघ्या :** तर काय ... जाई देवीला चांगलाच बळी सांपडला म्हणायचा

**विक्राळसिंग :** जा– पुढे जावून नीट टेहळणी कर.

**वाघ्या :** ( थोडासा पुढे जावून पहात ) सरदारजी, बाई अगदी जवळ पोचलीय तिच्या बरोबर कुणीही नाही ... एकटीच येतेय. फार धीट दिसतेय काळजाची, पण एवढ्या अपरात्री ही जातेय तरी कुठे– ?

**विक्राळसिंग :** वाघ्या, तूं . . . थोडावेळ पलीकडल्या वडाच्या ढोलीत लपून रहा–मी पहातो कोण आहे ती (वाघ्या जातो) (पुढे जाऊन पहात) अरे व्वा ! ही तर आपली शालन–पण एवढ्या घाई-घाईनं ही येतेय तरी कशासाठी . . . ? थोडा वेळ आपण गप्प रहावं हेंच खरं (किंचीत मागे वळतो) दुसऱ्या क्षणी शालन घाबऱ्या घाबऱ्या प्र. क.

**शालन :** विक्राळभय्या–विक्राळभय्या –अरे तुझ्या जिवाला फार मोठा धोका आहे. या माळावर तू राहू नकोस. विक्राळ, तुझ्या जिवाला धोका आहे हे कळतांच अपरात्री साऱ्यांच्या नजरा चुकवून आणि प्राण मुठीत घेऊन मी या माळावर आले ( पुढे येत ) विक्राळभय्या अरे कसला विचार करतोहेस तू --- चल निघ लवकर. एक क्षणसुद्धा इथं राहू नकोस.

**विक्राळसिंग :** का . . . ? असं कोणतं संकट हात धुवून लागलंय माझ्या पाठीमागे. नाही – नाही शालन. कृतांत काळ जरी यावेळी माझ्यासमोर उभा राहिला तरी हा डाकू विक्राळसिंग मुळीच डगमगणार नाही -- आयुष्यात पर्वताएवढ्या उंच आणि दरीसारख्या अनंत खोल . ज्याचं वर्णन कुणीही करु शकणार नाही अशा महाभयंकर संकटाचा पाठपुरावा केलाय मी शालन .

**शालन :** भय्या–अरेपण कसं समजावु तुला ? नाही . . . नाही विक्राळ तू इथं थांबू नकोस . . . माझी शपथ आहे तुला.

**विक्राळसिंग :** शालन–मूर्खपणा करुं नकोस–आजवर मी माया ममतेच्या माणसाचं ऐकलं नाही . . तिथं तुझ्यासारख्या एका मानलेल्या बहिणीचं ऐकूं - - नाही शालन - - - आलिस तशी चालती हो इथून– मला सावध करण्याचा प्रयत्न करु नकोस. तू माझी मानलेली बहिण आहेस हे त्या जहागिरदाराला माहित नाही–म्हणूनच मला वाटतं काही तरी कारस्थान करून मला मारण्यासाठी पाठवलंय तुला होय ना ?

**शालन :** नाही--नाही रे माझ्या भय्या. तू मात्र भारीच संशयी आहेस हं-- अरे मी माझ्या भाऊरायाच्या जिवाचा घात करीन का ? भय्या तुला हे सुचलं तरी कसं बोलायला ? माझ्यावर एवढाही नाही का तुझा विश्वास? तुला वाटतंय का मी तुझं काही बरं वाईट करीन असं? अरे माझ नशीबच

खोटं त्याला तू तरी काय करणार आहेस ! ना आईबाप–ना भाऊ बहिण–जन्माला आले एक बेवारशी म्हणून आणि जगांत जगतेय सुद्धा तशीच. आठवते तुला ती रात्र, भवानवाडीतल्या देवळातली ? मी त्यावेळी नुकतंच तारुण्यात पदार्पण केलं होतं – भर ज्वानीने बहरले होते; देवीची जत्रा होती त्या दिवशी ... माणसांची नुसती झुंबड उडाली होती. देवळाचा गाभारा धुपाच्या सुगंधानं गच्च भरला होता .. लोक प्रदक्षिणा घालित होते .. काही पोरी पुढे होत्या .. मी सर्वांच्या मागून होते. प्रदक्षिणेच्या मार्गात मागच्या बाजूनं लहानसं दार होतं. मी चालत होते. कसलीही कल्पना नसताना ! दरवाजासमोर पोचले मात्र आणि अचानक एका गुंडानं माझ्यावर झेप घेतली. माझ्या गळयातली चेन त्यानं तोडली व पळणार एवढयात त्यावर वाघासारखी कुणीतरी झेप घेतली आणि त्याच्या पोटावर लाथ मारून तो तरुण माझ्या जवळ आला– मला कृतकृत्य झालं. तो तडफदार तरुण तूच होतास विक्राळ ... तेव्हांपासून मी तुला माझा भाऊ मानू लागले. आता सांग भय्या ... मी तुझ्या जीवनाचा शेवट करीन ? एवढी कृतघ्न होईन ?

॥ पद ॥

तूं भाऊराया माझा सखया ।  
करीते मी तुजवरी माया ॥ ध्रु. ॥  
कृष्ण सावळा धावूनी आला ।  
कौरवांचा पडता घाला ।  
तैसा तूं रे धावसी राया ॥ १ ॥

विक्राळ : अग मग असं कोणतं संकट येणारेय माझ्यावर ?  
शालन : तूं ऐकणार असशील तर सांगून उपयोग त्याचा–  
विकाळसिंग : ए सांग–ऐकतो मी–  
शालन : तूं जहागिरदाराला आज पैसे घेऊन इथं बोलावलं आहेस ना?  
विक्राळसिंग : होय त्याचीच वाट पहातोय मी

शालन : भय्या-अरे त्यानं फार मोठा विचित्र बेत आखलाय तुला ठार मारण्याचा.

विक्राळसिंग : कोणता बेत आखलाय त्यानं . . . ?

शालन : तो तुझ्यासाठी यम्या बेरडाला पाठवणार आहे थैली देवून

विक्राळसिंग : अग मग फारच छान झालं म्हणायचं ! वाघाच्या गुहेत बोकड आयता चालून आला, येवू दे त्या बेरडाला-मग पहातो काय ते ?

शालन : पण त्याच्याकडची थैली मात्र घेऊ नकोस. तूं घेतलीस तर प्राण गमावून बसशील

विक्राळसिंग : कां . . ? असं कोणतं कपट कारस्थान रचलंय जहागिर-दारानं . . ?

शालन : जहागिरदार त्या थैलीत पंचविस हजार रुपयाऐवजी विषारी काळ-सर्प ठेवणार आहे-उद्देश हाच की थैली सोडताच तुला सर्पानं दंश करावा.

विक्राळसिंग : अरे वारे तुझी जागिरदार ! माझ्या नाशासाठी असा अघोरी डाव रचलाहेस तर तू . . . पण पुरतं ध्यानात ठेव . . हा डाकू विक्राळसिंग तसा सहजासहजी मरणार नाही . . ठिक आहे शालन एवढ्या अपरात्री तूं एकटी या माळरानावर येऊन मला आगावू सूचना दिल्याबद्दल मी तुझा ऋणी आहे. तुला ना आईबाप ना भाऊबहिण- पण हा डाकू विक्राळसिंग तुझा मायबाप आहे- असं समज आणि एक गोष्ट ध्यानांत ठेव, जर यदा कदाचित मला तुझी- मदत घ्यावी लागली तर तू मात्र जातीनं आलं पाहिजे-

शालन : माझ्या भय्यासाठी पंचप्राण जरी खर्ची घालावे लागले तरी मला त्याची मुळीच किंमत नाही. माझ्याकडून जेवढं काही करता येईल तेवढं मी करीन.

विक्राळसिंग : ठीक आहे, आता तू जा – जाशील ना एकटी ? की येतेस माझ्या गुहेत ?

शालन : नाही विक्राळ, आता मी जाते – तुझ्या गुहेत राहायला येईन मी एक दिवस, पण सावध रहा हं-

विक्राळसिंग : माझी मुळीच काळजी करू नकोस तू शालन. पण तू एकटी

कशी जाणार आहेस ? थांब तुला सोबत देतो. वाघ्या अरे ए वाघ्या. ( वाघ्या येतो. )

वाघ्या : मला हाक मारलीत सरदारजी ?

विक्राळसिंग : होय- हिला माळरानाच्या पायथ्याशी नेवून सोड आणि हे बघ- जाताना अत्यंत सावधपणे जा हं. वाटेत यम्या बेरड मिळण्याची शक्यता आहे.

वाघ्या : त्याची मुळीच चिंता करु नका सरदारजी-कृतांत काळ जरी आपला भयाण जबडा उघडून माझ्यासमोर थयथय नाचला तरी हा वाघ्या तिळमात्र घाबरणार नाही . . . चला बाई (दोघं जातात)

विक्राळसिंग : उद्या जहागिरदाराच्या बंगल्यावर धाड ही निश्चितच. माझ्या नाशासाठी विषारी सर्पाची योजना केलीस काय ? अरे कशाला त्या बिचाऱ्याला त्रास दिलास ? त्यापेक्षा तूंच कां आला नाहीस भयाडा . . ?

यम्या बेरड : ( प्र क. ) ए भ्याड, कुणाला म्हणतोहेस रे पळपुट्या ? ही थैली घे पंचवीस हजाराची आणि गुमान चल आपल्या वाटेनं. ( पुढे येवून ) धर . . . घे . . . ही थैली.

विक्राळसिंग : ए . . . एक पाऊलही पुढे टाकण्याचा वेडेपणा करू नकोस ( बंदूक रोखून ) चल . . . निघ इथून त्या थैलीसह . . . आणि जावून सांग तुझ्या त्या माजलेल्या हरामखोराला—उद्या डाकू विक्राळसिंगचा डाका पडणारेय म्हणून तुझ्या बंगल्यावर—ह्या थैलीतली रक्कम त्याच्याच हातानी मोजून घेणारेय मी चल . . . न पेक्षा नाहक प्राणाला मुकशील . . . (बेरड विक्राळसिंगच्या अंगावर सुरा रोखून धावणार इतक्यात मागावून त्याला भैरव धरतो) पडदा

## प्रवेश ५ वा

स्थळ राजू जहागिरदारची बैठकीची जागा . वेळ दुसऱ्या दिवशीच्या रात्रीची. राजू रंगा बोलत बसले आहेत . . .

राजू : ( वैतागून ) अरे पण त्या बेरडाकडे असलेली पंचवीस हजार रुप-

याची थैली घेतली का नाही त्या विक्रालसिंगनं. मला वाटतं आमच्या कारस्थानाची कुठे तरी हवा गेलेली दिसतेय - -

रंगा : बरोबर आहे तुमचं म्हणणं . . . न पेक्षा त्या डाकूनं थैली घेतली असती. ज्या अर्थी त्यानं यम्यावर बंदुकीची गोळी झाडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला त्याअर्थी त्या डाकूला थैलीतलं रहस्य समजलेलं दिसतंय – पण एवढी गुप्त बातमी त्याला कळेलच कशी - - ?

राजू . मला वाटतं याच गावातला एखादा गावकरी त्या डाकूला फितूर असावा–इथल्या काही मूठभर मिजासखोर गावकऱ्यांची त्याला फूस आहे.

रंगा : तुम्हाला कदाचीत राग येईल, पण मी जे ऐकलंय त्यावरुन माझी तरी खात्री झालीय . . .

राजू : काय ऐकल आहेस तू . . . ?

रंगा : तुमची हरकत नसेल तर सांगतो मी . . . पण गुन्हेगाराला कडक शिक्षा मात्र केली पाहिजे . . . मग तो गुन्हेगार पुरुष असो वा, एखादी स्त्री असो.

राजू : तू फक्त मला नांव सांग पुढची जिम्मेदारी माझ्यावर.

रंगा : श्रीमंत, काल रात्री माळरानावर जाताना एकानं तुमच्या शालन-बाईला पाहिलंय - - - ज्यानं मला ही बातमी दिली तो खोटं सांगणार नाही याची मला खात्री आहे.

राजू : ( रागाने ) काय . . ? शालन काल रात्री माळावर गेली होती ? मग त्याच चांडाळणीनं थैलीतलं गुपीत फोडल असावं. पण रंगा, शालनची आणि त्या डाकूची मैत्री आहे का रे ?

रंगा : आतां मैत्री शिवाय कोण जाईल आपला जीव धोक्यात घालायला ?

राजू : हो तेही खरं ! पण शालन तर आमच्या बाजूची आहे-ती असा विश्वासघात कसा करील . . . ?

रंगा : श्रीमंत, बायकावर जास्त विश्वास ठेवू नये.

राजू : ठीक आहे, आत्तांच्या आता शालनला निरोप पाठवतो. हंटरचे चार फटकारे बसल्याशिवाय वदणार नाही ती. गणा,अरे ए गणा (आलो-आलो)

गणा : ( प्र. क. ) जी जाहागिरदार साहेब, काय करू मी आपली सेवा ?

राजू : आत्तांच्या आत्ता शालनला बोलावून घेवून ये इथं . . .

रंगा : श्रीमंत वाट पहाताहेत म्हणावं तुझी–

गणा : आणि येत नाही म्हणाली तर— ?

राजू : तिची काय ताकद आहे येत नाही म्हणायची ! – तिचा बाप येईल.

गणा : आत्ता हो—! अहो तिचा म्हातारा कसा येईल स्वर्गातून. त्यो मेलाय नव्हका- त्येचा खून झालाय.

राजू : ( उसळून ) साल्या – साल्या पुढे बोलू नकोस – जा चालता हो लवकर - -

गणा : अव पन एवढं गरम कशापाय होतायसा ? म्या अडानी मानूस. आपलं बोललो झालं – बाप येल – तर बाप येल – म्या जातो. ( आत जाऊं पाहतो )

राजू : कुठं जातोहेस –?

गणा : आतमंदी – वाटणं वाटाया.

राजू : वाटणं जाऊं दे चुलीत – अगोदर शालनला घेऊन ये.

गणा : अव पन त्येचा बाप येणारेय नव्ह का ? मंग ती आनि कशापाय ? त्योच येव दे - -

राजू : गणा हंटरनं पाठ फोडीन हं जास्त फाजीलपणा केलास तर.

गणा : अव तेवढं सोडून म्होरं बोला— म्या जात नाय म्हनालोय का ? ह्या बघा मी जातोच.

राजू : लवकर घेऊन ये तिला.

गणा : आत्ता ह्ये बघा काय त्ये ! अव बायकू माणूस ती- तिच्या चाली-नंच मला चालाया होवं– हक्कानं ओढून आणाया ती काय माझी बायको हाय ? तरी पन व्हईल तेवढी खटपट करतो. (जातो)

रंगा : गणाचं हल्ली निराळंच दिसतंय लक्षण.

राजू : जमल्यास यंदापासून कमी करणारेय त्याला कामावरून.

रंगा : हो, त्याला कमी करायचं हेच खरं, अहो एवढी वरचढ माणसं उपयोगाची नाहीत. प्रत्येकानं आपली मर्यादा सांभाळून वागायला हवं.

राजू : सद्या मलाच सांभाळून राहायला हवं. तो चवताळलेला डाकू आज देखिल माझ्या बंगल्यावर धाड घालायला मागेपुढे पाहाणार नाही. कारण ज्या अर्थी त्याला थैलीतलं रहस्य समजलंय, त्या अर्थी तो आज बोलल्या-प्रमाणे निश्चितच डाका घालणार.

रंगा : अहो पण त्याला उपाय आहे.

राजू : कोणता उपाय ? बंगला सोडून मी दुसऱ्या ठिकाणी जाऊं ?

रंगा : छे छे. अहो बंगला कशाला सोडायला हवा. डाक्यामध्ये जे काही मौल्यवान नेण्यासारखं आहे तेवढं दुसऱ्या ठिकाणी ठेवावं ... नाही म्हणजे तुम्हाला पटतंय तर पहा - –

राजू : मग आपण असं करुया. शालन येऊन गेल्यानंतर माझ्या बंगल्यातल्या मौल्यवान चीजा, दागदागिने, आणि रोख रक्कम मी तुझ्या स्वाधीन करतो, तू ती तुझ्या घरी नेवून ठेव. म्हणजे निदान तेवढं तरी शाबूत राहील.

रंगा : होना–अहो डाका पडो अगर न पडो. आपण अगोदर सावध असलेलं बरं

राजू : माझी नक्की खात्री आहे की तो डाकू आजच बोलल्याप्रमाणे डाका घालणारेय . राहून ... राहून माझ्या डोळ्यापुढे तोच प्रसंग एखाद्या चित्रासारखा उभा राहातोय.

रंगा : अहो घालूंदे त्याला खुशाल डाका... मौल्यवान दागदागिने आणि पैशाची रक्कम सारं काही असणारेय माझ्या घरी. आलं म्हणजे इकडे तिकडे नाचेल आणि हात हलवीत निघून जाईल.

राजू : अगोदर शालनची पाठ नरम करतो आणि नंतर पुढचं.

रंगा : हो, आता तीच यायला हवी लवकर.

राजू : पण माझी शालन एवढी विश्वासघातकी असेल असं मला तरी वाटत नाही

रंगा : पण मला ज्या माणसानं सांगितलंय त्याचा तर मला विश्वास आहे. उगाच खोटं का म्हणून सांगेल तो ? ( बाहेरुन शालन व गणा येतात ) ही पहा शालनबाई आलीच.

शालन : श्रीमंतानी असा अचानक का बरं निरोप पाठविला ?

राजू : काही महत्वाची कामं असतात . . . ये अशी समोर उभी रहा बघू ( ती पुढे येते ) मला असं सांग, मी जे ऐकलंय ते खरं आहे का ?

शालन : काय ते - ?

राजू : तू काल रात्री १२ वाजण्याच्या सुमारास जाईच्या माळरानावर गेली होतीस असं मी ऐकलंय.

शालन : अगबाई ! जाईच्या माळरानावर ? रात्री बारा वाजता .. ? नि मी एकटी बाईमाणूस . ? छे बाई ..! कुणीतरी उगाच कान भरवलेले दिसतात तुमचे ... अहो माझ्यावर विश्वास ना तुमचा ... श्रीमंताच्या पायाची शपथ घेऊन सांगते की मी माळरानावर गेले नाही ... आता तरी झालं समाधान, अहो ज्या माळरानावर दरोडेखोरांचं थैमान माजलंय तिथं मी जाईन कशी ? साधं तुम्ही "जाईचं माळरान" म्हणालात –पण माझी छाती किती धडधडायला लागली.

राजू : पाहिलंस रंगा– मी तुला प्रथमच सांगितलं होतं की माझी शालन मला विश्वासघात मुळीच करणार नाही. मला वाटतं तुला उगाच म्हणाला असेल कुणी तरी थट्टेखातर.

रंगा : छे हो तो माणूस तसा नाही

शालन : मग काय मी तशी आहे— ?

राजू : तो विषयच काढू नकोस तू आता. रंगा चला पाहू— आत जाऊन आम्ही कामाला लागू या.

शालन : कसल्या कामाला ?

राजू : अग आज त्या लुटारू बदमाषाचा दरोडा पडण्याचा संभव आहे.

शालन : पण तुम्ही काय करता ?

राजू : दागदागिने हिरे माणकं सारं... सारं काही एका गाठोड्यात बांधून रंगा पाटलांच्या घरी सुरक्षीत ठेवायचं म्हणतोय.

शालन : हो, ही युक्ती मात्र फार नामी आहे. चला मी ही मदत करते तुम्हाला.

राजु : रंगा, गण्या, चला

**गणा :** अव हृये काय सांगाया होवं– ( राजू, शालन–रंगा व गणा आंत जातात. थोड्या वेळाने बाहेरुन विक्राळसिंग–भैरव व वाघ्या दबकत, दबकत प्र. क.

**विक्राळसिंग :** ऐकलंत वाघ्या–भैरव, जहागिरदाराचं बोलणं ?

**भैरव :** हो आजचा डाका मात्र कमी श्रमात जास्त फायदा मिळवून देणारेय आम्हाला. सरदारजी, जहागिरदार गाठोडे घेऊन बाहेर आला की बंदूका रोखायच्या–

**वाघ्या :** भैरव तू काहीच बोलू नकोस. सरदारजी सांगतील तसं होऊ दे. होय ना सरदारजी – ?

**विक्राळसिंग :** हे बघा – आता मुळीच वेळ दवडावयाचा नाही. तुम्ही दोघे त्या सोफाच्या आड लपा – तोपर्यंत मी बाहेर थांबतो. आतून जहागिरदार बाहेर आलेला दिसला की तुम्ही चटकन त्याच्यावर बंदूका रोखून उभं राहायचं– समजलं . . जा लपा तिथं (ते लपतात – तो बाहेर जातो– थोडया वेळानं राजू, शालन व रंगा बाहेर येतात – राजू दिसताच ते दोघं बंदुका रोखतात)

**राजू :** (घाबरून) अरे बापरे, !

**रंगा :** श्रीमंत, श्रीमंत, तुम्ही पळा आंत...

**विक्राळसिंग :** ( प्र. क. ) ए, नामर्द भेकडा... कुठं चाललास पळून... हातात कांय आहे तुझ्या..?

**राजू :** ( घाबरुन ) हा... हातात . दागिने... पैसे . .

**विक्राळसिंग :** मुकाटयानं आमच्या हवाली कर.

**राजू :** प — पण—

**विक्राळसिंग :** ए, प-प काय करतोहेस मूर्खासारखा. चला रे वाघ्या भैरव. जहागिरदाराच्या हातातली दागिन्याची थैली काढून घ्या ( दोघे धावत पुढे येतात व थैली काढून घेतात ) चला आल्यासारखं आपलं काम झालं अच्छा जहागिरदार, भेटू असेच कधी तरी आयुष्याच्या समरांगणात. चला रे. ( तिघेहो जातात ) पडदा पडतो.

♣ ♣

# अंक २ रा

## प्रवेश १ ला

स्थळ : जाईच्या माळरानावरील विक्राळसिंगची गुहा, विक्राळसिंग शांतपणे येरझारा घालीत आहे–थोडचा वेळाने बाहेरुन वाघ्या व भैरव येतात ...

**विक्राळसिंग :** काय रे ... कुणी दिसतंय का माळावरुन येताना ...?

**वाघ्या :** होय सरदारजी रंगा पाटील येतोय. फार दूर आहे अजून

**विक्राळसिंग :** कोण ? रंगा पाटील येतोय. . त्या हरामखोर जहागिरदाराचा चमचा. पण हे बघा त्याला असा साधा सरळ येऊ देवू नका. गुहेच्या दाराआड दोघेही लपून रहा आणि अत्यंत दक्षपणे बाहेर टेहाळणी ठेवा ... गुहेच्या जवळ रंगा पाटील पोंचलाय–असं कळताचं धावत बाहेर चला आणि त्याचं तोंड काळ्या बुरख्यान बांधून टाका .. ही दक्षता का माहित बाहेना तुम्हाला ...

**भैरव :** गुहेतील खाणाखुणा त्याला कळू नयेत म्हणून

**वाघ्या :** पण सरदारजी, यावेळी तो येतोय तरी कशाला इथं ? मला वाटतं त्याच्या येण्यामागे काहीतरी नक्की कारस्थान असावं.

**विक्राळसिंग :** तसा काही कमी अधिक प्रकार माझ्या दृष्टीस पडलाच तर रंगा पाटील या गुहेतून जिवंतच जावू शकणार नाही.

**भैरव :** पण सरदारजी, रंगा पाटलानं पोलीसाना गुहेची दिशा दाखविली तर?

**विक्राळसिंग :** ही दिशा सहजासहजी कुणालाही दिसणार नाही. मला नाही वाटत- रंगा पाटील आमच्या गुहेमध्ये येईल. तो आला असेल माळरानावरील आपली शेती पाहायला. अरे ही गुहा एवढी गुप्त स्वरूपाची आणि अनेक प्रचंड शिलासमुहानी दडलेली आहे. इथ यायला दिसतं तेवढं सोप नाही भैरव. फार गुंतागुंतीची अवघड गुहा आहे ही. तुम्ही असं करा. इथं लपून न राहता सरळ बाहेर चला आणि रंगा पाटील काहीशा अंतरावर दिसतांच एकदम जोरात धांवत जावून त्याचं तोंड बुरख्यान झाका.

तो ओरडेल. प्रतिकार करील. पण तुम्हा दोघांपुढे त्याचं कांही चालणार नाही... तावडतोब त्याला उचला आणि वायुवेगानं मार्ग आक्रमून गुहा गांठा. चला निघा लवकर.

वाघ्या :
भैरव : } (जशी सरदारजींची आज्ञा... दोघे बाहेर जातात )

विक्राळसिंग : हा रंग्या पाटील कां येतोय कुणास ठाऊक ... जहागिदारानं तर पाठवला नसेल ना ? येऊदे तर खरा- पाहूया काय सांगतोय ते. काही कमी अधिक बोललाच तर आजच्या आज त्याचा बळी जाईदेवी समोर द्यायचा ... नि प्रेत कर्दन खिंडीच्या टेकडीवरुन म्हसोबाच्या दाट झाडीत फेकून द्यायचं ... बिचाऱ्या कोल्हया कुत्र्याना तेवढाच खुराक मिळेल. .. ( बाहेरुन वाघ्या, रंगा पाटलाला तोंड बुरख्याने झांकलेल्या अवस्थेत पाठीवरून आणतो—मागोमाग भैरव असतो )

वाघ्या : सरदारजी – आम्ही आलो – ( पाटलाला उतरवतो, तो घाबऱ्या मनःस्थितीत कसाबसा उभा राहतो ) इकडेच येत होता म्हणे हा –

विक्राळसिंग : काय रे रंग्या पाटला – कुणीकडे निघाला होतास तू ?

रंगा : (भीतभीत) ना .. नाही .. मी मी ...

विक्राळसिंग : यावेळी तू कुठे आहेस याची कल्पना आहे ना तुला ? जे काही सांगायचं असेल ते नीट सांग . . काही लपवून ठेवण्याचा प्रयत्न केलास तर बंदूकीच्या एकाच गोळीनं जागच्या जागी गारद करून टाकीन. बोल, कुठं जात होतास तू – ?

रंगा : सांगतो—पण ... पण मी कुठं उभा आहे . ? आणि मला अशा अवस्थेत इथं का आणलंय ... ?

विक्राळसिंग : यावेळी तू विक्राळसिंगच्या अत्यंत अवघड व भयाण अशा गुहेतल्या खलबत खान्यात उभा आहेस . बुरखा घालून माझ्याच साथीदारानी तुझं तोंड झाकलंय, हेतू हाच की या गुहेमध्ये शिरायच्या चोरवाटा तुला .. कळू नयेत. . हं ... बोल कुठं जात होतास तू ?

रंगा : मी आपल्याच पाशी येत होतो सरदारजी ...

विकराळसिंग : माझ्यापाशी... ? पण या गूहेच्या चोरवाटा कशा कळणार होत्या तुला...

रंगा : शोधीत शोधीत येणार होतो.

विक्राळसिंग : अरे सी आय. डी. खात्याला जिथं कोपर टेकायची पाळी आलीय तिथं तुझ्यासारख्याची काय कथा ?

रंगा : म्हणजे अजूनही माझी ओळख पटलेली नाही तर तुला ...

विक्राळसिंग : अरे चांगला ओळखतोय मी तुला. तू चमचा आहेस त्या हरामखोर जहागिरदाराचा.

रंगा : अरे तुझ्या शोधासाठी दऱ्याखोऱ्या पालथ्या घालणारा – रात्रीच्या रात्री खपून तुझी गुहा शोधणारा ... हा रंगा पाटील म्हणजे गावातला साधा गावकरी नव्हे...

विक्राळसिंग : म्हणजे कोण आहेस तू ...? ( भैरव, वाघ्या पवित्रा घेऊन राहातात. विक्राळ बंदुकीचा नेम धरतो ) बोल – बोल लवकर. तू कुणीही असलास तरी मुळीच भीत नाही मी – सांग कोण आहेस तू ?

रंगा : रंगा पाटील हे खोटं नाव धारण करून तुझ्यासारख्या एका डाकूचा शोध करणारा सी. आय. डी. इन्स्पेक्टर आहे मी. मुकाट्यानं माझ्या तोंडावरला बुरखा काढायला सांग तुझ्या साथीदारांना. नपेक्षा (रिव्हॉल्व्हर काढतो ) गोळी आर-पार घुसली जाईल.

विक्राळसिंग : ठीक आहे– वाघ्या– भैरव– साहेबांच्या तोंडावरचा बुरखा काढा (ते तो काढतात) काय हो, काय म्हणणं आहे आपलं ?

रंगा : बऱ्या बोलानं गुहेत यायच्या चोरवाटा मला दाखव–

विक्राळसिंग : चोरवाटा दाखवू ? अरे वारे वा तुझी पाटला ! सी. आय. डी. इन्स्पेक्टर कधीपासून झालास ?

रंगा : ए- दरोडेखोरा माझी थट्टा करतोहेस काय साल्या ?

विक्राळसिंग : पाटला, तोंड सांभाळून बोल न पेक्षा..

रंगा : नपेक्षा काय करणार आहेस तू ?

विक्राळसिंग : योग्य तेच करीन मी. बोल खोटं का बोललास माझ्याशी ? का आला होतास जाईच्या माळरानावर ?

रंगा : तुला शोधण्यासाठी...

विक्राळसिंग : जास्त बोलू नकोस रंग्या. मुकाट्यानं खरं काय ते सांगून

आपली जान वाचव – नपेक्षा – हात-पाय बांधून आतल्या अंधाऱ्या खोलीत डांबून ठेवीन तुला जन्मभर – समजलास. सांग .. का आलास तू माळरानावर – ?

रंगा : एकदा सांगितलं ना. परत – परत काय विचारतोहेस ? अरे आता तुझे दिवस भरलेत. आता कुठं जाशील तू पळून. आज रात्री तुझ्या गुहेवर पोलीसांची धाड पडलीच म्हणून समज. अच्छा येतो मी .(जावू लागतो)

विक्राळसिंग : ए पाटला – कुठं जातोहेस रुबाबात ?

रंगा : पोलीस स्टेशनवर ...

विक्राळसिंग · माझी एक विनंती आहे आपल्यापाशी.

रंगा : कोणती .. ?

विक्राळसिंग तुम्हांला आमचा सुगावा तर लागलाच– आतां यापुढे आम्ही तुमचे बंदी आहोत. पुन्हा तुमची आमची भेट कशी होईल देवाला ठावुक तेव्हा आल्यासारखे–चार फळं तरी खावून चला. आपण सरकारी अधिकारी–आम्ही आपल्या सारख्याना काय देणार ... ?

रंगा : ठीक आहे ! आपल्या आतिथ्याबद्दल मला आनंद झाला.

विक्राळसिंग : वाघ्या– भैरव, साहेबाना हाताला धरून हळू आत घेऊन जा. आंतल्या पाषाणी आसनावर त्याना बसवा. समोर फळानी भरलेलं ताट ठेवा. आणि ते खायला लागले की, जागच्या जागी दोरखंडानं त्याना करकचून बांधून टाका.

रंगा : काय ? काय ?

विक्राळसिंग : वाघ्या, भैरव चला रे या तोतयाला घेऊन (त्याला नेतात) माझी दिशाभूल करतोस काय हरामखोरा. म्हणे मी सी. आय. डी. इन्स्पेक्टर आहे–वारे याची ! विश्वासघातानं माझा गळा कापायला आला होतास काय ? अरे तुझ्यासारखे हजारो सी. आय. डी. इन्स्पेक्टर जरी मला घेरण्यासाठी आले तरी हा डोंगराच्या कपारीतला चुवा कुणालाच सांपडणार नाही ( बाहेरून लगबगीने शालन प्र. क. )

शालन : भय्या– भय्या–अरे तुला पकडण्यासाठी गावातून रंगा पाटील आलाय – जहागिरदाराच्या बंगल्यात तुला पकडण्याचा विडा उचलून

आलाय तो-मी हे सर्व ऐकलंय म्हणूनच तांतडीने लपत-छपत इथे आले... चल थोडा वेळ- गुहा सोडून दुसरीकडे कुठेतरी निवारा शोधू.

विक्राळसिंग : पाटलाचा बाप जरी स्वर्गातून जिवंत होऊन आला तरी हा विक्राळसिंग गुहेतून तसूभरही हलणार नाही. अग त्या नामर्द भेकडाची भिती मला नाही वाटत. तो जहागिरदाराचा चमचा आहे . . माझं काय करील तो ?

शालन : असं म्हणू नकोस विक्राळ . . .

विक्राळसिंग : मला पुन्हा विक्राळ म्हणू नकोस शालन .. माझ्या खऱ्या नावानंच मला हाक मार.

शालन : खरं नाव ? म्हणजे ? विक्राळ हे तुझं खरं नाव नव्हे ?

विक्राळसिंग : नव्हे - माझं खरं नाव .

शालन : काय . काय तुझं खरं नाव ?

विक्राळसिंग : सांगेन कधी तरी. यावेळी आवश्यकता नाही त्याची.

शालन : मग मी काय म्हणू तुला- ?

विक्राळसिंग : भय्याच म्हण...अग हो, पण काय ग शालन, तो रंगा पाटील कुठं गेला ? तुझी त्याची गाठ पडली होती कां ?

शालन : मला वाटतं तो एव्हाना जवळपासहि असेल गुहेच्या, पण त्याला आंत यायची चोरवाट मात्र कळणार नाही-

विक्राळसिंग : शालन-अग तू एवढी कां घाबरतेस-माझ्या जिवाला ? माझं बरं वाईट झालं तर तुला दु:खी व्हायचं कारण नाही-किती झालीस तरी तू माझी मानलेली बहिण.

शालन : रक्ताच्या नात्यापेक्षा मानलेलं नातं जास्त लळा लावतं भय्या ! मी जरी तुझी मानलेली बहिण असले तरी सख्ख्या बहिणीपेक्षा माया करतेय तुझ्यावर - जत्रेच्या दिवशी माझ्या गळ्यातील चेन तोडून तो मवाली माझी अब्रू लुटण्यासाठी मला ओढून नेणार इतक्यात तू धावलास पाठीराख्यासारखा आणि माझी अब्रू वाचवलीस, तेव्हापासून मी तुला भाऊ

मानू लागले. पण भय्या तू हे असलं भयानक जीवन का रे जगतोहेस ? किती दिवस या भयाण अंधाऱ्या विश्वात तू राहाणार ?

**विक्राळसिंग :** याबद्दल यावेळी तू काहीही विचारू नकोस मला शालन. मी हे डाकूचं जीवन का जगतोय ते यथावकाश सविस्तर सांगेन तुला. प्रथम त्या हरामखोर जहागिरदाराला काही गोष्टींचा जाब विचारणारेय मी. बऱ्या बोलानं वदला तर ठीक नपेक्षा त्याचं अवतारकार्य संपवणारेय मी.

**शालन :** कसला जाब विचारणार आहेस तू जहागिरदाराला ?

**विक्राळसिंग :** तो सुद्धा फार गुंतागूंतीचा विषय आहे शालन. यावेळी मला तू काहीही विचारीत राहू नकोस–जाई देवीच्या दर्शनाला जायची वेळ झालीय माझी .चलतो मी ( जायला वळतो )

**शालन :** ( थांबवीत ) थांब भय्या–असा एकटा जाऊ नकोस बाहेर–

**विक्राळसिंग :** शालन अग रंगा पाटील माझ्या अंधाऱ्या खोलीत करकचून बांधून ठेवलेला असताना भ्यायचं कुणाला–?

**शालन :** म्हणजे ? पाटील इथं आला ?

**विक्राळसिंग :** तो आला नाही–येण्याच्या प्रयत्नांत होता–माझ्याच साथीदारानी त्याला शिताफीने पकडून आणला इथं–येताच त्यानं आपली सुटका होण्यासाठी एक अनोखा डाव रचला.

**शालन :** म्हणजे ? काही दगाफटका केला तर नाही ना–

**विक्राळसिंग :** अग तो काय करील माझं...शेळपट भ्याड जनावर ते–मला म्हणाला आपण सी. आय. डी. इन्स्पेक्टर आहे.

**शालन :** अरे व्वा! बरीच मजल गेली रंगा पाटलाची. .

**विक्राळसिंग** तू राहाणार आहेस ना आज ?

**शालन :** होय काही वेळ इथंच थांबणार आहे मी ..तू जातोस ना देवीच्या दर्शनाला ?

**विक्राळसिंग :** हो आलोच मी लवकर – आणि हे बघ – आत माझे दोघे साथीदार आहेत. त्याना सांग कंदमुळं आणि फळं आणायला – येतो मी. ( जातो – ती हर्षभराने गाणं म्हणते )

पद

केवारी माझा गुणी भाऊराया
मजवरी त्याची अनंत माया ॥ धृ ॥
किती आपदा भोगी जिवाला
कडेकपारी लपवी मनाला
राखी तयाला देवराया ॥ १ ॥

( गाणं संपताच आत जायला वळते ... पडदा पडतो. )

## प्रवेश २ रा.

स्थळ : गावाबाहेरचा एक रस्ता – कांचनलाल लगबगीने प्रवेश करतो.

**कांचनलाल :** साला त्या गारुडीने आमाला शंभर रुपीयाना तर टोपी घातलीच. ती शाली बाईच्या मांडीवर गेली. आनी आमची रुपीया पाण्यामंदी गेली...आता येवू दे तरी खरी तो गारुडी. च्यांगला फोडून काढते त्याला..

**जिवा :** प्र. क. ए–कुणाला रे फोडून काढतोहेस.. ? मला? अरे मग तुला मंतर कोण शिकवणार...?

**कांचनलाल .** गारूडा–आमाला तू फशवली, तू आमची दुष्मन हायेस आनि आता तुझ्याकडे मंतर शिकणार ? नाय– नाय आमाला आमची शंभर रुपीया पायजे, शाली आमाला लुबाडते काय ?

**जिवा :** अरे त्या शिवा गावकऱ्याने समंध काढून घेतलाय. आज देईल तो मला शंभर रुपये – त्याने देताच ताबडतोब तुझ्या हातावर घालतो. आता तरी झालं ना तुझं समाधान ?

**कांचनलाल :** आमाला आता पायजे १०० रुपीया – आमाला फशवते काय गारुडा ?

**जिवा :** वेताळा शपथ तुला उद्या पैसे देतो.

**कांचनलाल :** उद्या जर आमची शंभर रुपीया नाय दिली तर आमी सिदा पोलीस स्टेशनवर आयेल. शमजली.

**जिवा :** अरे उगाच का मी वेताळाची शपथ दिली. वेताळ आम्हा लोकांचं मुख्य दैवत. त्याचा कोप झाला तर संपलाच आमचा बाजार. हं तू मंतर शिकणार आहेस ना ?

**कांचनलाल :** अरे पन तू पोशा किती घेनार मंतरचा ?

**जिवा :** छे, छे ! मी एक कवडीही घेणार नाही तुझ्याकडून. अरे तू माझा दोस्त आहेस – मी तुला मोफत मंतर शिकवणार. समजलास चल बैस इथं.

**कांचनलाल :** शाली अमाला जमनीवर बशवते काय?

**जिवा :** अरे ह्या आड रस्याला कुठं मिळणार खुर्च्या आणी चटया. इथंच बैस तू – मी सुध्दा बसतो तुझ्याजवळ

**कांचनलाल :** पन काय रे गारुडा आमाला येल काय रे तुजि मंतर?

**जिवा :** अरे मी शिकवतो ना तुला चल बैस (दोघे बसतात ) हं नीट बैस ( तो मांडी घालतो ) हं आता हात जोड

**कांचनलाल :** आमाला हात जोडायला सांगते काय ? अरी गारुडा जनमा-मंदी आमीं कुणाचा हात नाय जोडली – समदी आमालाच हात जोडते. आनि तू आमाला हात जोडायला शांगते ? नाय – नाय आमी हात जोड-णार नाय –

**जिवा :** अरे पण हात जोडल्याशिवाय देव प्रसन्नच होणार नाही. मंतर शिकतांना प्रथम वेताळाची प्रार्थना करावी लागते.

**कांचनलाल :** शाली पारथना करायला शांगते काय – हं ही बघ आमी हात ज्योडली ( उलट नमस्कार करतो )

**जिवा :** ए मारवाड्या, हात कसा जोडतोहेस रे तू. नीट जोड. हा. बघ असा ( आपण जोडून दाखवतो ) हा शाबास आता कसं झालं. .

**कांचनलाल :** ए शाली गारुडी, मंतर जल्दी शिकव आमाला.

**जिवा :** थोडासा धीर धर .. हं आता मी सांगतो तसं म्हण. वेताळा वेताळा धांवत ये

**कांचनलाल :** वेताळी वेताळी धावत ये.

**जिवा :** वेताळी नव्हे वेताळा पुरुष आहे तो... म्हण वेताळा वेताळा धावत ये.

कांचनलाल : वेताळा वेताळा धावत ये.

जिवा : हं शाब्बास. आजपासून मी जंतर-मंतर फुंकरणार

कांचनलाल : आज आमी जंतर मंतर फुकणार.

जिवा : फू करणार नव्हे- फुंकणार

कांचनलाल : अशी काय ! हं आता बराबर म्हनते आज आमी जंतर-मंतर फू करणार ...

जिवा : वारे माझ्या दोस्ता.

कांजनलाल : वारे माजी मैतर.

जिवा : अरे हा मंतर नव्हे.

कांचनलाल : अरी ही मंतर नव्हे.

जिवा . अरे असं काय म्हणतोस ? नीट म्हण ना

कांचनलाल : अरी अशी काय करते ? च्यांगला म्हण ना.

जिवा : ( स्वगत ) छे छे. हा तर मी बोललेलं बोलतोय. बोलू दे- याला असंच शिकवाव हं म्हण.

कांचनलाल : हं म्हन –

जिवा : त्या दिवशी तू आम्हाला भेटलास –

कांचनलाल : त्या दिवसेंला तू आमाला भेटलीस –

जिवा : भले शाब्बास !

कांचनलाल : अरी गारुडा आमाला हीच मतर शिकवते काय तू ?

जिवा : हा – हा यालाच आम्ही मंतर म्हणतो –

कांचनलाल : शाली आमाला फशवते काय रे गारुडा ?

जिवा : नाही रे माझ्या दोस्ता. हं म्हण- आम्ही तुला बाईबद्दल म्हणालो.

कांचनलाल : याला बी मंतर बोलते काय गारुडा ?

जिवा : हा हा यालाच मंतर म्हणतात. हं म्हण–

कांचनलाल : आमी तुला बायडीबद्दल म्हणालो.

जिवा : शाब्बास.

कांचनलाल : शाब्बास हे बी मंतर ?

जिवा : हो — हो – हा सुद्धा मंतर – बाई आली – आम्हाला दिसली

सौदा पटला- पैसा ही मिळाली - म्हण बाई आली.

कांचनलाल : बायडी आली.

जिवा : आमाला दिशली

कांचनलाल : आमाला दिशली

जिवा : सौदा पटला

कांचनलाल : सौदा पटली

जिवा : पैसा मिळाला

कांचनलाल : पिशा मिळाली

जिवा : आम्ही माडीवर तुम्ही खाली

कांचनलाल : आम्ही मांडीवर तुम्ही खाली

जिवा : भूत- भूत- वेताळा ! पैसे माफ तुला बाळा- बाळ गेला पळून- मारवाडी मेला चिडून- म्हण भूत, भूत!

कांचनलाल : ए गारूडा, शाला आमची टेर करते काय? तुजी मंतर रे कसली? चल फूट, नायतर आमी दंगा करेल इथं - शमजली. ( बाजूनं गणा प्र क. )

गणा : हात्तीच्या ! तुम्ही लोक इथं हाय व्हय, ( दोघे उठतात ) काय रे बाबानो काय करतायसा रस्त्यावर ?

कांचनलाल : हा शाली गारुडा - मला खोटा मंतर शिकवते- आमाला येडा शमजते काय गारुडा ? ( मारायला जातो )

जिवा : अरे पन असा मारायला काय धावतोस ?

कांचनलाल : मारायेला ? शाला आता तुला नाय ठेवते ( अंगावर मुठी आवळून जातो) आमाला फशवते काय गारुडा ?

गणा : आत्ता हो ! अहो तुमी लोक भांडतायसा कशापायी ? तकड जागिरदार तुमची वाट बघत्यात कवापामनं. आणि तुमी इथं भांडत बसल्याती ? चला म्या तुमाला न्याया आलोय समदा गांव आडवा तिडवा केला, पन तुमचा पत्ता नाय. चला, चला बिगी बिगी.

कांचनलाल : ए गारुडा चल, माजी शंभर रुपीया काढ, नाय तर ठार मारते तुला आमी.

जिवा : मी एकदा सांगितलं तुला संध्याकाळी नाय तर उद्या नक्की. परत परत काय मागतोस ? मंतर सिकवायला बसलो तर तोही तुला जमत नाही. चल अगोदर जागिरदारानी कशाला बोलावलंय ते पाहुया.

कांचनलाल : अरी झागिरदार ग्येला ह्यात. अगोदर माजी काय ती बोल.

गणा : कांचनलाल अरे तुमी लोक असं काय करतायसा ? जिवा बोलत्यो तसाच वागणारा माणूस हाय. तो उद्या देनार म्हणतोय नव्हं का तुझे पैसे? मग परत परत काय इचाराया लागलायसा.

कांचनलाल : गणा भाय– तुमाला एक शांगते– गारुडाने जर उद्याला पैसा दिला नाय तर आमी तुमच्याकडून वशूल करून घेते शमजली ?

गणा : अव पन माजाकरं कुठं हाय एवढी रक्कम, जिवाबाचा इशवास नाय का तुम्हासनी ?

कांचनलाल : आमाला इशवास होती म्हणून आमी शंभर रुपीया दिली.

जिवा : होय ना मग आजचा दिवस थांब उद्या तुझे पैसे गणाच्या साक्षीनं नक्की देतो.

कांचनलाल : आता कशी झ्याली. हं काय गणाभाय तू आमाला कुठं नेते?

गणा : हे काय ते बघा ! अव तुम्हा दोघासनी न्याया आलोय म्या.

कांचनलाल : अरे पण नेणार कुठे ती तरी शांग ?

गणा : आत्ता हो ! अव जागिरदाराच्या घरी. चला बिगी, बीगी.

( सर्व जातात. पडदा )

## प्रवेश ३ रा.

स्थळ : राजू जहागिरदाराची बैठकीची खोली – राजू विचारमग्न बसला आहे

राजू : साला केवढा वेळ ह्या गणाला – कधीचा गेलाय त्या मारवाड्याला आणि गारुड्याला शोधायला मेले कुठे पडलेत दारु पिवून कुणास

ठावूक ! पण हा अजूनपर्यंत कसा आला नाही ? ( बाहेरून जिवा–कांचनलाल व गणा येतात )

गणा : हये बघा काय ते ! अब दिसभर इचार कसला करतायसा. हये बघा –दोघेबी आले–आले कसले म्हना–आणलेच की-हो बिगी–बिगी–

राजू : गणा तू आंत जा–मला कांही इचारायचंय याना–

गणा : हये बघा कायते ! अब इचारा की–म्या कुठे नको म्हनताय ? म्या आपला गडी मानूस–म्या आतच जातो (जातो)

राजू : गारुड्या, असा नजरेसमोर उभा राहा माझ्या–

जिवा : (घाबरत पुढे येतो) काय म्हणता जहागिरदार साहेब–

राजू : जहागिरदार गेला मसणात.

कांचनलाल : तुमी तर इथं हाय, मसणामंदी कवा गेली ? आमाला फशवते काय ?

राजू : मारवाड्या, गरजेशिवाय तोंड उघडू नकोस. तुझाही नंबर लागणारेय याच्या नतर – बोल रे ए गारुड्या, शालन कुठं आहे ?

जिवा : आता मी कसं सांगू श्रीमंत ?

राजू : खोटं बोलू नकोस साल्या – तू तिच्यावर काहीतरी जादूटोणा केलास आणि तिला नाहीशी केलीस. बोल कुठं आहे माझी शालन ?

जिवा : खरं सांगतो मी श्रीमंत यातलं कांहीही मला माहित नाही. नाहक गरीबाला कशाला त्रास देता–?

राजू : साल्या, तिच्या माडीवर जाताना तू गरिब नव्हतास–? झाडून साले चोरांचे भागीदार, बोल मुकाट्यानं न पेक्षा हंटरनं, पाठीचीडी चांम फोडून काढीन तुझ्या

कांचनलाल : च्यांगली फोडूनशान काढा गारुड्याला. शाली आमची शंभर रुपीया देत नाही अजून–फोडा-फोडा-गारुडाची पाठ

जिवा : नका श्रीमंत– गरिबावर दया करा मारू नका मला

राजू : आतां दया नाही अन् क्षमाही नाही ( हंटर काढून ) बाल काय केलंस माझ्या शालनचं ?

जिवा : नाही– नाही– मी काही केलं नाही तुमच्या शालनचं ?

**राजू :** ( मारीत ) सल्या माझ्याशी खोटं बोलतोस होय (मारतो) सांग शालन कुठं आहे ?

**जिवा :** ( विव्हळत ) नाही– देवाशपथ मला माहीत नाही

**राजू :** ( मारतो ) माहीत नाही काय— थांब तुला आता ठारच मारतो. ( बंदूक काढून रोखतो ) बोल आता तरी सत्य काय आहे ते सांगून आपला प्राण वाचव. बोल कुठं आहे शालन ?

**जिवा :** तुम्ही गोळी झाडा, वाटल्यास माझे हाल-हाल करून मला मारा पण मी खरं तेच सांगतोय, तिचा पत्ता मला माहित नाही.

**कांचनलाल :** अरी शांगनी. शांगनी शाला तू मेली तर आमची शंभर रुपीया कोन देणार ? शांगनी.

**जिवा :** मी मुळीच खोटं बोलणार नाही.

**राजू :** गारुड्या, माझ्याशी गाठ आहे एवढं लक्षात ठेव. हा जहागिरदार म्हणजे विषारी सर्प आहे. ज्यानं त्याला डिवचला त्याचा पिच्छा तो पुरवणारच– बोल कुठं आहे शालन.

**जिवा :** मला माहीत नाही.

**राजू :** तुला माहीत नाही. मग कुणाला माहित आहे? सल्या मला फसवतोस काय. ( चाप ओढणार एवढ्यांत बाहेरुन विक्राळसिंग प्र. क. )

**विक्राळसिंग :** खबरदार जहागिरदार. मुकाट्यानं बंदूक बाजूला ठेव.

**राजू :** कोण.... ? डाकू विक्राळसिंग .... ?तूं. . ?

**विक्राळसिंग :** होय-मीच तो डाकू विक्राळसिंग ! तुझा कर्दन काळ ! ह्या गरिबाला का त्रास देतोहेस तू ? काय केलंय ह्यानं तुझं ?

**राजू :** त्यानं जे केलंय त्याचाच जाब विचारतोय मी त्याला. त्याच्याशी तुझा काय संबंध ?

**विक्राळसिंग :** जगात जेवढे जेवढे म्हणून गरिब आहेत त्यांच्याशी माझा मौलिक संबंध आहे. जहागिरदार. मी गरिबांचा वाली आणि तुझ्यासारख्या बलाढ्य श्रीमंताचा कर्दनकाळ आहे समजलास ? बोल काय केलंय तुझं यानं ?

**राजू :** त्यालाच विचार तू, तोच देईल तुला याचा जाब.

**विक्राळसिंग :** त्याला विचारायची गरज नाही. मला तूच सांग त्यानं काय केलंय तुझं ?

**राजू :** माझ्या प्रेयसीवर जादू-टोणा केलाय या हरामखोरानं. तिला कुठं तरी दडवून ठेवलीय यानं ...

**विक्राळसिंग :** नाही जहागिरदार, त्यानं तुझ्या प्रेयसीला जादू-टोणा केलेला नाहीय. नाहक आळ घालतोहेस तू त्याच्यावर. तुझी प्रेयसी माझ्या गुहेत सुखरूप आहे. आणि तुझा तो चमचा रंगा पाटील सुद्धा.

**राजू :** काय ऐकतोय हे मी— माझी शालन तुझ्या गुहेत ? आणि माझा रंगा पाटीलसुद्धा. पण .. पण ती गेली कशी तुझ्या गुहेत ? मला वाटतं तुझं काही तरी कारस्थान आहे. मुकाट्यानं आजच्या दिवसांत दोघांचीही मुक्तता कर गुहेतून. न पेक्षा परिणाम फार वाईट होईल

**विक्राळसिंग :** अरे जारे — कोण भिक घालतोय तुझ्या धमकावणीला. शालन आणि रंगा पाटील याना मी माझ्या गुहेतून मुक्त करणार नाही. मग काय आहे तुझं म्हणणं ?

**राजू** : माझ्याशी नाहक वल्गना करु नकोस विक्राळसिंग, मला पुरता ओळखलंस नाही तू अजून. मुकाट्यानं त्यांची मुक्तता कर.

**विक्राळसिंग** मुळीच नाही — तुला काय हवं ते कर. पहातो मी तुझी ताकद. अरे हा विक्राळसिंग भ्याडाची अवलाद असता तर हे डाकूचं जीवन जगला नसता — तुझ्यापेक्षा बलाढ्य दादाना आडवे केलेहेत मी — समज-लास —? चला रे तुम्ही आपापला जीव वाचवा.

**कांचनलाल :** अरी गारुडा चलनी, चलनी — आमची १००रुपीया देवून टाक.

**जिवा :** छे बुवा ! तू भारी त्रास देतोहेस मला — अरे तुझे शंभर रुपये खावून पळालोय का मी ?

**कांचनलाल :** अरी बाबा, पन इथून एकदांची चल बघू - नाय तर फूकट मरशील, चलनी. ( दोघे जातात )

**विक्राळसिंग :** जहागिरदार, मी विचारतो त्या प्रश्नांची उत्तरं हवी आहेत मला.

**राजू :** कां म्हणून , ? आणि प्रश्न विचारायचा तुला काय अधिकार ?

**विक्राळसिंग :** पुढे बोलू नकोस साल्या–शेखर जहागिरदाराच्या बापाचा खून कुणी केला ?

**राजू :** त्याचा खून शेखरनेच केलाय– आणि त्या दिवसापासून तो फरारी आहे.

**विक्राळसिंग :** नीट सांग– शेखर माझा मित्र आहे. त्यानं बित्तंबातमी दिलीय मला.

**राजू :** काय ? शेखरनं तुला सांगितलंय ? तो कुठं मिळाला तुला ?

**विक्राळसिंग :** माझ्याच गुहेतल्या एका अंधाऱ्या खोलीत राहातोय तो. त्याला मी संरक्षण दिलंय तिथं. बोल आबासाहेबांचा खून कोणी केला ?

**राजू :** शेखरने--

**विक्राळसिंग :** माझ्याशी दगाबाजी करशील तर बंदुकीच्या एकाच गोळीनं ठार करीन साल्या– नीट सांग ( पुढे सरकून हंटर उचलतो ) बोल

**राजू :** मी सांगतो ते सत्य आहे विक्राळसिंग– खराच त्याने [redacted] खून केलाय–

**विक्राळसिंग :** (चाबूक मारीत) हरामखोर माणसा– अजूनही खोटंच बोलतोस काय ? पण लक्षात ठेव मी शेखरला वचन दिलंय.

**राजू :** कसलं वचन ?

**विक्राळसिंग :** तुला ठार मारण्याचं – त्याच्या सांगण्यावरून तूच आबासाहेबाचा खुनी आहेस. स्वतःचं पाप लपावं म्हणून शेखरच्या अंगरख्यात रक्तानं माखलेला सुरा लपवलास तू आणि ओरडत जाऊन पोलीसाना कळवलंस, पण शेखर अगोदरच घरांतून पळाला होता.

**राजू :** त्यानं जर खून केला नाही तर मग तो पळाला का ?

**विक्राळसिंग** त्याला स्वतःला अंधारात राहून खऱ्या खुन्याला प्रकाशात आणायचा होता. पश्चात्तापानं तो दीनवाण्यागत भटकत होता. मिळेल तिथे ! एक दिवस असाच मला दिसला— थकलेला, भेदरलेला. मी जवळ गेलो- विचारपूस केली. त्याने मला सारी हकीकत सांगितली... मला फार वाईट वाटलं— मी त्याला आश्रय देण्याचं वचन दिलं. तो आनंदानं बेभान झाला. गेली चार वर्ष शेखर माझ्याकडे आहे. मी त्याला काही कमी

पडू दिलं नाही. माझ्या गुहेत काल अचानक तो रडू लागला मी त्याला रड-ण्याचं कारण विचारलं त्यावेळी तो म्हणाला, 'विक्राळ तू तरी माझ्या बापाच्या खुनाचा बदला घे' मी त्याला वचन दिलंय, जहागिरदारसाहेब, की आजपासून आठ दिवसाच्या आत मी तुझ्या बापाच्या खुन्याला ठार मारीन. आता बोल साल्या- आबासाहेबाचा खून कुणी केला?

**राजू** : तुझी दिशाभूल केलीच त्या हरामखोरानं ..

**विक्राळसिंग** : ए. हरामखोर कुणाला म्हणतोहेस तू ? शेखर माझा प्राण आहे. त्याला उणं, अधिक बोललेलं खपणार नाही मला.

**राजू** : तो प्राण असेल तुझा. पण माझा हाडवैरी आहे तो. मी त्याचा थोरला भाऊ, पण नात्यागोत्याचं काहीही ठेवलेलं नाहीय त्यानं. इस्टे-टीची वाटणी करीत नाही म्हणून चांडाळानं आबा गाढ झोपेत असताना त्यांच्या छातीत तीक्ष्ण सुरा खुपसून त्यांचा निर्घृण खून केला. त्याला देव कधीही क्षमा करणार नाही. तो तुझ्या गुहेत दडी देऊन आणि खुळ्याचं सोंग घेऊन बसलेला असला तरी आम्ही त्याला शोधून काढणार आहोत. या जगातून त्याला नाहीसा करूनच मी आबाच्या आत्म्याला शांती लाभ-वून देणार आहे.

**विक्राळसिंग** : जहागिरदार, तो माझ्या गुहेत आहे एवढं लक्षात ठेव. त्याच्या केसालाही धक्का लावण्याचा जरी प्रयत्न झाला असेल तरी हा डाकू विक्राळसिंग जातीनं त्याचं रक्षण करील—समजलास—बोल अजूनही सत्य सांगून आपली जान वाचविण्याचा प्रयत्न कर.

**राजू** : मुळीच पर्वा नाही मला माझ्या जिनगानीची

**विक्राळसिंग** : ठीक आहे तुला असा सहजा सहजी मारण्यात अर्थ नाही. तुझे हाल हाल करून कुत्र्याच्या मौतीनं तुला ठार मारायला हवं — आज पासून चार ते सहा दिवसाच्या आत जर तू बदला नाहीस तर मात्र विक्राळसिंगाशी तुझी गाठ आहे एव्हढं लक्षात ठेव.

**राजू** : अरे कोणाला भय दाखवतोहेस मरणाचं— ज्यानं पाप केलं नाही त्याला भय कसलं ? शेखरला तुझं जरी संरक्षण असलं तरी काही हरकत नाही. तुझ्याशी डाव खेळेन तर मीच. पहातो तू काय करणार आहेस ते.

**विक्राळसिंग :** जहागिरदार असा उन्मत्त होऊ नकोस, तुझे सहस्त्र अन्याय भरत चालले आहेत पापपुण्यालासुद्धा मर्यादा असते. पुण्याचा संचय करायला फार युगे लागतात. पाप एका निमिषात आपली हजेरी लावतं. जोपर्यंत पापाचा घडा भरत नाही तोपर्यंतच पुण्याचं थैमान चाललेलं असतं. शेखरच्या सांगण्यावरून तूच आबासाहेबाचा खुनी आहेस. त्याला वचन दिल्याप्रमाणे मला ते पूर्ण करायलाच हवंय- यापुढे तुझे डाव आणि माझी बुद्धि- पाहुया कोणाची हार अन कोणाची जीत होतेय ती.

**राजू :** अरे जारे पळपूटया, तुला कोण भितोय ?

**विक्राळसिंग :** ठीक आहे. पण लक्षात ठेव जहागिरदार, गरिबांच्या माना पिळून नि आयाबहिणींची अब्रू लुटून माजलेल्या तुझ्या सारख्या उन्मत्त बैलाला नाही चीत केला तर नावाचा डाकू विक्राळसिंग नव्हे! अच्छा येतो ( जातो ) प ड दा

## प्रवेश ४ था

स्थळ : जंगलाचा परिसर- माळरानावरील मोकळा भाग- वाघ्या व भैरव दूर पहात उभे आहेत.

**वाघ्या :** सरदारजी आले कसे नाहीत अजून ? त्या माथेफिरु जहागिरदारानं काही कुरापत तर काढली नसेल ना ?

**भैरव :** अरे गेला तुझा जहागिरदार खड्ड्यात - तो काय करील सरदारजीचं ? त्याच्या तावडीत सापडण्याइतके सरदारजी शेळपट वाटले की काय तुला ? अरे मर्दाची अवलाद आहे ती, मोडेल पण वाकणार नाही.

**वाघ्या :** पण काय रे भैऱ्या - रंगा पाटलाची नाडी मात्र एकदम थंड झाली नाही ? का जहागिरदाराची ?

**भैरव :** अरे दोन दिवस अन्नपाणी न मिळालेल्या माणसाची स्थिती आणखी कशी असणार- पण तू काहीही म्हण, सरदारजींनी मात्र योग्य तेच

केलं. न पेक्षा तो काही तरी दगलबाजपणा करून गेला असता.

वाघ्या : ते बघ सरदारजी आले..

विक्राळसिंग : (प्र. क.) वाघ्या– भैऱ्या– अरे तुम्ही काय करता इथं ? शालनला एकटीलाच ठेवून आलात गुहेत ?

वाघ्या : तिच्यासाठी कंदमुळे आणायला आम्ही इकडे आलो होतो. भेट झाली का जहागिरदाराची ?

विक्राळसिंग : भेटला हरामखोर पण वदला नाही अजून !

भैरव : काय म्हणतोय तो ?

विक्राळसिंग : तो काय म्हणणार आहे– त्याला कुठं आहे हिम्मत माझ्याशी जास्त बोलायची– पण एक दिवस त्याचाही समाचार घेणार आहे मी– त्याला या जगात जिवंत ठेवता उपयोगी नाही. ते जाऊ दे– रंगा पाट-लाची काय खबर ?

भैरव : गुमान पडून आहे जाग्यावर– काही खात नाही अन् बोलतसुद्धा नाही

विक्राळसिंग : त्याला सोडावं की सोडू नये कांहीच समजत नाही मला. सोडला तर साला सिदा पोलीस चौकीवर जाणार. त्या पेक्षा आहे तसाच असू दे दोन दिवस

वाघ्या : सरदारजी यावेळी त्याला मुळीच सोडू नका.

भैरव : सरदारजी कुणीतरी येतंय आमच्या रोखानं

विक्राळसिंग : ( पहात ) आमच्या रोखानं ? अरे हा तर आपला कांचन आणि तो कोण बरोबर. अरेच्या गारुडी देखील येतोय – याची आणि काय झाली भानगड. ( धावत रडत दोघे येतात )

कांचनलाल : सरदारजी–सरदारजी आमाला वाचवा. तो बघा, यम्या बेरड आमाला ठार माराया धावते. वाचवा–वाचवा आमाला –

विक्राळसिंग : काय म्हणतोहेस मारवाड्या ? यम्या बेरड इकडे येतोय.

जिवा : होय सरदारजी! जहागिरदाराने तुमच्या आणि आमच्या नाशासाठी यम्या बेरडाला भरपूर पैसा द्यायचा केलाय. तो बघा प्रत्यक्ष यमासार-खाच धावत येतोय इकडे.

**कांचनलाल :** आरी मारो डाकोरजी– आमी मेली तर आमची बायडी रांडवी व्हयेल-- सरदारजी आमाला लपवा कुठे तरी.

**विक्राळसिंग :** अरे आम्ही तिघे या ठिकाणी असताना त्या यमाला कशाला घाबरता तुम्ही. येवू दे. तुम्हाला भीती वाटते तर त्या समोरच्या झाडीत लपा तुम्ही. मी पहातो तो काय करतोय ते ( पुढे येतो )

**कांचनलाल :** चलनी चलनी गारूडा-अरी तू मेली तर माजी शंभर रुपीया कोन देल ? चलनी चलनी झाडीमंदी.

**जिवा :** आणी तू मेलास तर माझे शंभर रूपये कोण घेईल ? चल चलनी (दोघे पळत जातात. दुसऱ्या बाजूने यम्या बेरड हातात फरशी घेऊन येतो

**यम्या :** ए – गुहेतल्या चोरा, काय करतो आहेस रे इथं.

**विकाळसिंग :** कोण येतंय ते पहातोय

**यम्या :** पाहिलंस ना नीट पहा पहा. बाबा ! नंतर पाहता येणार नाही.

**विक्राळसिंग :** का रे बाबा – माझे डोळे तर फोडणार नाहीस ना तू ?

**यम्या :** डोळेच काय – सारा देहच फोडणारेय मी तुझा. गुमान माझ्या प्रश्नाना उत्तरं दे – जास्त वट-वट करू नकोस – बोल गारुडी आणि मारवाडी कुठं आहेत ?

**विक्राळसिंग :** दोघेही सुखरूपपणे आहेत. का–रे बाबा ?

**यम्या :** त्याना मुकाट्यानं माझ्या स्वाधीन कर – राई–राई एवढे तुकडे करणार आहे मी त्यांचे. जहागिरदाराचा हुकूम आहे मला तसा– बोल लवकर.

**विक्राळसिंग :** पण त्यानी काय केलंय तुझं ?

**यम्या :** माझं कुणीही काही करीत नाही. मीच भरपूर पैशांच्या मोबदल्यात कुणालाही ठार मारतो. माझा धंदा आहे तो– यम्या बेरड म्हणतात मला. आजपर्यंत कित्येकाना या फरशीच्या एकाच धावासरशी स्वर्गात पाठवलेत

**विक्राळसिंग :** आणखी काय करायला सांगितलंय तुला जहागिरदारानं.

**यम्या :** तुला रे कशाला हव्याहेत चांभार चौकशा. जे करायचंय ते मी नीट करणारेय. अगोदर त्या मारवाड्याचा नि गारुड्याचा समाचार घेतो. आणि मग तुझ्याकडे वळतो. बोल कुठे आहेत ते दोघे.

**विक्राळसिंग :** ते माझ्या आश्रयाला आले आहेत. ज्याना मी आश्रय दिला त्यांची गर्दन मी तुझ्या हातात देऊ . ? वारे बेरडा, बराच तयार दिसतोस तू !

**यम्या :** ए– गुमान त्याना माझ्या स्वाधीन कर.

**विक्राळसिंग :** आणि नाही केले तर .. ? काय करणार आहेस तू ?

**यम्या :** काय करणार ? काय करणार ? या फरशीनं मुंडकं उडवीन तुझं ( उगारतो )

**विक्राळसिंग :** बेरडा...? बोलताना जरा हळू बोल ?

**यम्या :** का रे ? मला तुझी भीती वाटते की काय ? अरे तू ओळखलंस नाही या यम्याच्या अंगचं पाणी. म्हणूनच असं बोलतोस तू— त्या दिवशीच तुझ्या आतड्या बाहेर काढणार होतो मी – पण तुझ्या ह्या विश्वासघातकी साथीदारानं अचानक मागाहून करकचून आवळलंन मला. पण आज मात्र फार सावध आहे मी – बोल लवकर – कुठं लपवून ठेवले आहेस त्याना ?

**भैरव** . ए यमा – कुणाला म्हणतोहेस रे विश्वास घातकी ? साल्या पुन्हा असं म्हणाल्लास तर एकही दात शिल्लक ठेवणार नाही समजलास.

**यम्या :** वा एव्हडी ताकद आहे का तुझ्या अंगात ?

**वाघ्या :** अरे तुझ्या दसपट ताकद आहे आम्हा सर्वांच्या अंगात.तू आता बोल तर खरा.

**यम्या :** (फरशी उगारून धांवतो ) चोरानो. खांडोळी करीन एकेकाची

**विक्राळसिंग :** (हात पकडून) ए बेरडा, जास्त हुशारी दाखवू नकोस माझ्या पुढे बोल कोण हवेत तुला ?

**यम्या :** अगोदर हात सोड मुकाट्यानं... आणि दूर उभा राहून बोल माझ्याशी (हिसका देत) सोड–सोड म्हणतोय ना ?

**विक्राळसिंग :** (जास्त घट्ट धरीत) अरे तुझा हात कुणी धरलाय ते ठाऊक आहे ना ? असेल हिम्मत तर सोडवून घे आपला हात न पेक्षा .. चुकून इथं आल्याबद्दल माझी क्षमा माग

**यम्या :** ए दरोडेखोरा, क्षमा कुणाला मागायला सांगतोहेस मला ? अरे वा

मी तुझ्यासारख्या चोराची क्षमा मागून माझा जीव वाचविन असं वाटलं काय तुला ?

**विक्राळसिंग :** मग घे तर सोडवून तुझा हात— पहातो तुझा त कद अरे हा विक्राळसिंग म्हणजे मेणाचं बाहुलं समजलास की काय तू? मुठीच्या ठोशान कणखर पाषाण जिथं ठिसूळ ढेकळाप्रमाणं फसकन फुटतात, त्या या पकड- लेल्या मुठीची ताकद काय असेल, याची जरा कल्पनाच करून पहा की, बोल कोण हवंय तुला ?

**यम्या :** अस्सं काय ! मग पहातो तुझ्या मुठीची ताकद. ( फरशी विक्राळसिंगावर उगारणार इतक्यात प्रसंग ओळखून भैरव व वाघ्या त्याला झटदिशी पकडून बाजूला घेतात, फरशी गळून पडते )

**वाघ्या :** तुझी आता काही घडगत नाही बेरडा.

**भैरव :** तू आता मेलासच म्हणून समज.

**यम्या :** ( सुटण्याची धडपड करीत ) नाही – नाही हा यम्या बेरड तेवढा शेळपट नाही.

**विक्राळसिंग :** मग काय आम्ही शेळपट आहोत ? भैरव, या हराम- खोराला असाच फ फटत ओढीत न्या कर्दनखिडीच्या टेकडीपर्यंत- तिथं याचे हात पाय करकचून बांधा कणखर वेलीच्या पाशानं आणि क्षणा- चाही विचार न करता याला म्हसोबाच्या दाट झाडीत फेकून द्या. चला.

**यम्या :** (काकूळतीने) नका नका,मला अशी घोर शिक्षा देवू नका-वाटल्यास तुम्हा सर्वांची क्षमा मागून जातो मी.

**विक्राळसिंग :** नाही – तुझ्या सारख्या निर्दय बेरडाला अशाच प्रकारची शिक्षा द्यायला हवी – तू जातीवंत मांग आहेस – गुजरी हयातभर कित्येक स्त्री पुरुषांची निर्दयपणे मुक्या जनावरासारखी कत्तल करुन स्वतःचं पोट भरत आलाहेस तू. आज तुझे सहस्त्र अन्याय भरलेत म्हणूनच तुला मी कर्दन खिडीच्या टेकडीवरुन म्हसोबाच्या दाट झाडीत, पाषाणांच्या काळ्या कभिन्न कातळावर अखेरची चिरनिद्रा द्यायचं ठरव- लंय. वाघ्या भैरव, मुळीच गय करु नका या कसायाची. चला निघा याला घेऊन.

**वाघ्या :** ए बेरडा चल गुमान आमच्या बरोबर–आरडा ओरडा केलास तर लाथा बुक्यानी हैराण करुं तुला.

**भैरव :** वाघ्या, चल ..म्हसोबाला या चांडाळ–नरबलीची आहुती देवूया. अजून फार कामं आहेत आपल्याला ...

**विक्राळसिंग :** ए बेरडा – वाटेत काही कमी जास्त करशील तर याद राख. ज्यानी तुला करकचून धरलंय ते माझे .. या गुहेतल्या क्रूर वाघाचे साथीदार आहेत एवढं लक्षात ठेव.

**यम्या :** ( रडव्या स्वरात ) नाही – नाही तुम्ही क्रूर नाही. दयेचे सागर आणि माझ्यासारख्या कसायाचे मायबाप आहात. मी एक तुमचा आश्रित आहे असं समजा. माझ्या कच्चाबच्चांकडे पाहून तरी माझ्यावर दया करा. आजवर मी पोटासाठी अनेकांच्या निर्दयपणे हत्या केल्या, पुष्कळ वेळा त्या जहागिरदारांच ऐकलं त्यांच्याकडून भरपूर पैसा ही घेतला. मी पापी आहे–कसाई–निर्दय .. बेरड आहे. तुम्ही गरिबांच्या मदतीला धावून जाता हे चांगल ऐकून माहितेय मला. म्हणून म्हणतो . मला सोडा. यापुढे मी हा धंदा मुळीच करणार नाही. निरपराधी आबालवृद्धाना, आयाबहिणीना टिचभर पोटासाठी हजारो रूपये घेऊन ठार मारणारा बेरड आज म्हसोबाच्या काळ्या पाषाणावर आपले डोक आपटून मेला.त्याच्या मासावर हाडांवर गिधाडांनी ताव मारला तो संपला गेला. आपला अस्तित्त्व विसरला. आज तुमच्या पुढ्यात पांच सहा पिलांचा अपराधी जन्मदाता उभा आहे. या पुढे विक्राळसिंग तिथे यम्या बेरड. आता तुम्ही मला खुशाल मारु शकता.

**विक्राळसिंग :** ठीक आहे. वाघ्या, भैरव आजपासून यम्या बेरड आमचा साथीदार म्हणून इंथ राहिल. चला त्याला गुहेत घेऊन. पण यम्या लक्षांत ठेव काही दगलबाजपणा करशील तर मात्र डाकू विक्राळसिंगशी गाठ आहे

( साथीदार त्याला नेत असताना पडदा )

वा० क्र० ९२०० | ... |
विषय

## प्रवेश ५ वा

स्थळ : विक्राळसिंगची गुहा.

शालन : अजून माझा भैय्या कसा आला नाही. वस्तीपासून लांबवर अस-लेल्या या निर्जन जागी भय्याला चैन तरी कसं पडतं देवास ठाऊक ! पण विचारा का म्हणून हे जीवन जगतोय तो – दरोडेखोराच जिणं म्हणजे - छे! विचारसुद्धा करवत नाही. पण मला माझा भय्या सांगेल का या मागचं रहस्य ? देवी जाईमाते तुलाच ग माझ्या भय्याची काळजी ... तूच त्याची आश्रयदाती अन् तूच त्याची कैवारी–

जाई माते वंदन तुजला
राखी तू गे मम बंधुला ।। धृ ।।
तू तयाची आश्रयदाती
सांभाळ तयाला या जगती
वंदन करिते तुझ्या पदाला ।। १ ।।

(गाणं संपताच बाहेरून यम्या बेरडासह वाघ्या व भैरव येतात)

वाघ्या : ए बेरडा ही पहा आमची गुहा

यम्या : फार गुंतागुंतीचा मार्ग आहे या गुहेत येणारा.

भैरव : अरे आमच्या सरदारजीनीच शोधून काढलीय ही निर्जन जागेतली गुहा. इथं कुणालाच तसं सहजासहजी येता येणार नाही.

शालन : अग बाई ! हा कुठं मिळाला याना ? काही दगाफटका करण्या-साठी तर आला नव्हता ना वाघ्या ... भैरव अरे हा बेरड कुठ मिळाला तुम्हाला ... ?

वाघ्या : सरदारजीना मारायला पाठविला होता जहागिरदारानं ... पण शेवटी बिचाऱ्यानं शरणागती पत्करली त्यांच्यापुढे आणि आमच्या टोळीत सामील झाला.

शालन : म्हणजे आजपासुन यम्या बेरड आपला माणूस म्हणून इथं राहा-णारेय का ?

**यम्या :** होय शालनताई – यापुढे जिथे माझे विक्राळसिंग सरदारजी तिथे हा यम्या बेरड –

**शालन :** व्वा ! यम्या, किती आनंद झाला माझ्या मनाला, पण काय रे वाघ्या – भैरव, अजून भय्याचा कुठं पत्ता नाही ? तुम्हाला भेटलाय का वाटेत ?

**वाघ्या :** होय –ताईसाहेब, सरदारजी थोडया वेळात येतील इथं. आम्ही यम्याला घेऊन पुढे आलो.

**शालन :** भैरव, फळं आणलीस ना ? की विसरलास...?

**भैरव :** छे विसरेन कसा वाघ्या यम्याला घेऊन तू आंत जा. गुहेतल्या संपूर्ण चोरवाटा त्याला दाखवून ठेव.

**वाघ्या** : चल यम्या तुला गुहेतल्या साऱ्या ओहऱ्या व वाटा दाखवतो.

**यम्या :** हो चल ( दोघे जातात )

**शालन** : काय रे भैरव यम्या बेरड शरणांगती पत्करायला कसा काय तयार झाला ? एवढा क्रूर निर्दय माणूस असा नरम कसा झाला ?

**भैरव** शरणांगती पत्करली म्हणूनच जिवंत सुटला आमच्या हातून– न पेक्षां म्हसोबाच्या दाट झाडीतल्या पाषाणावर एव्हाना-कोल्ह्या कुत्र्याची गर्दी जमली असती.

**शालन** : तरच त्यानं शरणांगती पत्करली. पण भैरव, ही बातमी जहागिरदाराला कळली की, मात्र त्याच्या अंगाचा भडका उडणार.

**भैरव :** त्या भ्याडाकडून यापुढे काहीही होणार नाही आमचं. त्याला देखील शरणांगती पत्करायचीच वेळ आलीय. न पेक्षा सरदारजी त्यांचा समाचार घेतल्याशिवाय मुळीच स्वस्थ राहाणार नाहीत ( विक्राळसिंग प्र. क. )

**विक्राळसिंग** : भैरव- यम्या आला की नाही नीट गुहेत ?

**भैरव :** होय सरदारजी अगदी गुमान आला. वाघ्या त्याला आत घेऊन गेलाय गुहा दाखवायला

**विक्राळसिंग :** ठीक आहे. तू आत जा आणि रंगा पाटलाला घेऊन ये माझ्या समोर.

**भैरव :** जशी सरदारांची आज्ञा. ( मुजरा करून जातो )

विक्राळसिंग : शालन, तू काय ठरवलं आहेस पुढे ? जाणार आहेस का गावात ?

शालन : मी गावात जावून जहागिरदाराला भेटते ...

विक्राळसिंग : पण अत्यंत सावध राहावं लागेल तुला.

शालन : त्याची मुळीच काळजी करू नकोस भय्या. मी जहागिरदाराशी कशी वागते याची कल्पना तुला आलेलीच आहे.

विक्राळसिंग : तुझं ठीक आहे – पण रंगा पाटलाचं काय ? त्याला सोडला तर काय होईल ?

शालन : काही होणार नाही. त्यानं पुरतं ओळखलंय तुला. यापुढे तो तुझ्या वाटेला येईल असं मला तरी वाटत नाही.

विक्राळसिंग : आणि आलाच तर तो या गुहेतून जिवंत जाणार नाही. (भैरव रंगा पाटलाला, बांधलेल्या स्थितीत आणतो )

भैरव : सरदारजी पाटलाला आणलाय !

विक्राळसिंग : ठीक आहे– जा तू आत ( भैरव जातो ) पाटील, काय विचार आहे तुझा ? मुकाट्यानं गाव धडीचा रस्ता धरशील कि नाही.

रंगा : सरदार, यापुढे मी आपल्या वाटेला मुळीच जाणार नाही.

विक्राळसिंग : कुणी सांगावा तुझा नेम ?

रंगा : नाही सरदार.मी शपथेवर सांगतो तुम्हाला की यापुढे तुमच्या विरूद्ध मी कसलीही कारवाई करणार नाही.

विक्राळसिंग : अरे तूं काय करशील माझं ! आणी तसा प्रयत्न केलास तर मात्र मेलास म्हणून समज.हा डाकू जेव्हडा शांत तेव्हडाच क्रूर आहे. माझ्याशी ज्यान दगाबाजी केली तो आपल्या प्राणाला मुकलाच. मग तो राव असो अथवा रस्त्यावरचा रंक असो !

रंगा : आपल्या ताकदीची कल्पना आलीय मला सरदारजी. जहागिरदाराचं ऐकलं पण घोर संकटांत सांपडलो मी इथं! यापुढे त्या हरामखोराची संगत करणार नाही मी.

विक्राळसिंग : मग घे तर जाई देवीची शपथ.

रंगा : जाई देवीची शपथ घेऊन सांगतो सरदारजी, मी या पुढे जहागिरदारांचं ऐकणार नाही, अन तुमच्याशी दगलबाजपणा करणार नाही.

विक्राळसिंग : ठीक आहे... पण लक्षात ठेव– जाईदेवीची शपथ मोडून जर माझा विश्वासघात करण्याचा प्रयत्न करशील तर मात्र तुझे राई-राई एवढे तुकडे केले जातील– समजलास ?

रंगा : नाही – सरदार – असं होणार नाही.

विक्राळसिंग : अच्छा ! एक वेळ तुला क्षमा करून तुझी मुक्तता करतोय मी ( हात सोडतो ) भैरव – अरे ए भऱ्या –

भैरव : ( प्र. क. ) जी – सरदार – काय हुकूम आहे ?

विक्राळसिंग : या रंगा पाटलाचं तोंड काळ्या बुरख्यानं झाकून याला गुहेच्या बाहेर नेऊन सोड.

भैरव : जशी आज्ञा सरदार. (बुरखा घालतो) चल रे पाटला ( दोघे बाहेर जातात)

विक्राळसिंग : रंगा पाटलाला तर घालवलाच- आता तुझं काय ?

शालन : मी ही जाते आज गांवात... पुन्हा येईन कधी तरी. राहून तरी काय करू इथं ?

विक्राळसिंग : तू गावांत जाते आहेस . पण एक गोष्ट मात्र ध्यानात ठेव. त्या जहागिरदाराशी जपून वाग– मोठा विक्षिप्त माणूस आहे तो... तूं माझ्या गुहेत आली आहेस हे त्याला ठाऊक आहे. तो तुला याबाबतीत काही तरी कमी अधिक विचारील, पण तूं मात्र विचारपूर्वक त्याला उत्तर दे. नपेक्षा सारा घोळ व्हायचा अन् रागाच्या भरात त्यानं तुझं काहीतरी बरं वाईट करायचं कारण मी वस्तीपासून फार दूर आहे. तुझ्यावर एखादं संकट आलं तर मला त्याचा पत्ता लागायचा नाही. तेव्हा प्रत्येक गोष्ट विचारांती कर म्हणजे झालं.

शालन : माझी कसलीच काळजी करू नकोस तू भय्या ... जहागिरदाराकडून मला काहीच दगा होणार नाही... आणि त्याने तसा काही तरी बेत रचला असेल तर मी माझ्या कौशल्याने त्यातून मार्ग काढीन .. बरं .. येते मी. तू तुझ्या जिवाला मात्र सांभाळून रहा.

विक्राळसिंग : जाईमातेच्या आशिर्वादाने अन् म्हसोबाच्या कृपेनं मी सुखरूप असेन. माझ्या विषयी उगाच चिंता करीत राहू नकोस तू शालन ··

तूच तुझ्या जिवाला जपून रहा म्हणजे झालं ... बरं ... जा तू ... फार लांबचा पल्ला गाठायचा आहे तुला.

शालन : बरं. येते हं मी भय्या !

विक्राळसिंग : ये . हं, सांभाळून जा. (जाते) रंगा पाटील गेला. शालनही गेली... आता पुढे काय ? भैरव कसा बरं आला नाही अजून? वाघ्या अरे ए वाघ्या ..

वाघ्या : (प्र. क.) जी . . . सरदार

विक्राळसिंग : यम्या काय करतोय आंत ?

वाघ्या : काही नाही . . बसलाय आतल्या ओहरीत.

विक्राळसिंग : त्याला घेऊन ये बाहेर.

वाघ्या : जशी सरदारांनी आज्ञा – (जातो)

विक्राळसिंग : गेले आठ पंधरा दिवस मनाशी ठरवून ठेवलेलं कार्य आज सिद्धीला न्यायलाच हवं .. कोणत्याही परिस्थितीत बाळासाहेब भोसल्याच्या वाड्यावर आज रात्री बारा वाजता डाका घालायलाच हवाय मला – त्याशिवाय मनाला मुळींच शांती लाभणार नाही .. गरिब शेतकऱ्यांची शेत-जमिन, गुजरी हयातभर गिळंकृत करून साला माजलाय पोळा सारखा ! स्मगलिंग तर त्याचा हातचा मळ.जेव्हडे खोटे धंदे करता येतील तेव्हडे करून हरामखोरान आपली तिजोरी खेचून भरलीय आज ती मला फाडायलाच हवी. त्याशिवाय त्याची घमेंड जिरणार नाही. डाका घालून जव्हडी रक्कम दागदागीने सांपडतील तेव्हडं सार गोरगरीबांना मोफत वाटून टाकायचं अन् रात्रंदिवस अन्नपाण्यावाचून तडफडणाऱ्या त्यांच्या कच्चाबच्चांना दिलासा द्यायचा. ( बाहेरुन भैरव येतो )

भैरव : सरदारजी रंगाला माळरानाच्या उतारावर पोंचवून आलो.

विक्राळसिंग : काय सांगत होता ?

भैरव : कांही नाही अगदी गुमान चालत होता माझ्या मागून

विक्राळसिंग : आता गुमानच चालणार आहे तो आयुष्यभर. आता आपणाला पुढच्या कार्याला लागलं पाहिजे.

भैरव : तुम्ही फक्त मुखांतून शब्द काढा सरदारजी . . .

विक्राळसिंग : आज रात्री बारा वाजता बाळासाहेब भोसल्यांच्या वाड्यावर डाका घालायचा आहे आपणाला.

भैरव : कांही हरकत नाही. मी एका पायावर तयार आहे ( आतून यम्या व वाघ्या प्र. क. )

वाघ्या : सरदारजी यम्या आलाय . . .

विक्राळसिंग : यम्या आजच तुझी भरती आमच्या टोळींत झालेली आहे. तेव्हा आजपासून तूं आमच्या बरोबर कामाला हजर रहायला हवं. आज रात्री आपणाला एका अवघड वाड्यावर दरोडा घालायचा आहे.

वाघ्या : सरदारजी आज दरोडा घालायचा ?

विक्राळसिंग : होय.

यम्या : कुणाच्या वाड्यावर सरदारजी ?

विक्राळसिंग : बाळासाहेब भोसल्यांच्या जंगी वाड्यावर ! फार माजलाय साला... वाघ्या भैरव आत जावून खान्याची तयारी करा. यम्या तू बंदुका भर आणि चाकू-सुरे कातडी बॅगेत घाल. चला लागा आपापल्या कामाला. (सर्व जातात) पडदा.

♣ ♣

# अंक ३ रा

## प्रवेश १ ला.

**स्थळ** : राजू जहागिरदाराची बैठकीची खोली ... राजूनं शालनला एका खुर्चीवर बांधलेली आहे व तो चवताळलेल्या सैतानागत तिला हंटरनं मारतोय ... ती विव्हळतेय.

**राजू** : ( मारतो ) मर–मर चांडाळणी ... तू आता काही माझ्या हातून जिवंत सुटत नाहीस. तुला डाकू विक्राळसिंग हवाय काय ? ( मारतो ) भोग – भोग आपल्या कर्माची फळं

**शालन** : (विव्हळत) नका श्रीमंत – मला मारु नका! सारं – सारं काही सांगते मी तुम्हाला मला तुमचा विश्वासघात करायचा नव्हता. कोणतंही कारस्थान करण्याच्या हेतूनं मी गेले नव्हते माळरानावर . मी फक्त त्याचं मन वळवायचा प्रयत्न करीत होते.

**राजू** : (मारतो) झूट – मत – बोल छबेलो. अजूनही तुझी फसवा फसवीच चाललीय माझ्याकडे .. पण लक्षात ठेव शालन, हा राजू जहागिरदार मुळीच गय करणार नाही तुझी. बोल, कसलं कृष्ण कारस्थान रचून आलीस त्या हरामखोर डाकूकडून ? कोण आहे तो तुझा ?

**शालन** : मारून मारून माझा प्राण घेतलात तरी चालेल, पण खोटं बोलणार नाही. कसलंही कारस्थान रचवलेलं नाही मी आणि तुमच्याशी विश्वासघातानं वागायची ही इच्छा नाही माझी. नाहक बंधन करून माझ्या देहाशी खेळताय तुम्ही श्रीमंत . . . कां म्हणून माझा असा छळ मांडलांत तुम्ही ? कां छळताहां निरपराधी अबलेला ?

राजू : शालन – तू माझ्या हातून सुटणार नाहीस एवढं लक्षात ठेव. जोपर्यंत तू सत्य वदत नाहीस तोपर्यंत तुझी सुटका होणार नाही माझ्या हातून (मारीत). बोल .. उघड तोंड – आणि सांग मला – का गेली होतीस त्या दरोडेखोराच्या गुहेत ?

शालन : नाही श्रीमंत . तुमच्यावर एखादं संकट ओढवून आणण्यासाठी मी त्या डाकूच्या गुहेत प्रयत्न करित नव्हते. माझ्या जाण्यामागे कोणतंही कारस्थान नव्हतं ... उगाच डोक्यात राख घालून घेता हा तुम्ही – मी तुमची प्राणदेवता आहे – काया वाचा मने तुम्हाला वरलंय मी. ज्या दिवशी हा देह तुमच्या स्वाधीन केला त्या दिवसापासून परपुरुषांच तोंड पाहिलं नाही मी ! तुमचा विश्वास घात करीन अस वाटतय काय तुम्हाला? विक्राळसिंग जसा तुमचा शत्रू आहे तसा माझा ही आहे. तुम्ही त्यांच्या नाशासाठी अहोरात्र तळमळता अन् मी तुमचे डाव हाणून पाडीन असं वाटतंय का तुम्हाला ?

राजू : गोड बोलून आणी प्रेमाचं नाटक करून माझी दिशाभूल करू नकोस शालन. किती झालीस तरी तू स्त्री आहेस स्त्रीवर कधीही विश्वास ठेऊ नये म्हणतात ते काही खोटं नव्हे. तू जर मुकाटयाने सत्य सांगत नसलीस तर पुढची योजना करावी लागेल मला

शालन : म्हणजे काय करणार आहांत तुम्ही माझं ?

राजू : अन्न पाण्यावाचून आंतल्या खोलीत खांबाला बांधून ठेवणारेय मी तुला आणि तुझ्या देहाची विटंबना करून ढसा-ढसा रडायला लावणार आहे.

शालन : ( दु:खानं ) नका . नका . श्रीमंत एवढे निष्ठूर होऊ नका. मला तुमचा मुळीच विश्वासघात करायचा नाही. माझे देव आहात आपण अन् मी य:कश्चित आपल्या पायाची दासी आहे.

राजू : नाही शालन, तुझा एकही शब्द ऐकून घेणार नाही मी तू ढोंगी आहेस . तुझ्यावर मुळीच विश्वास नाही माझा. थांब.आता तुला आंतल्या खोलीतच खांबाशी बांधून ठेवतो. गण्या . . . ए (गण्या आंतून थोडा येळ थांबा शिरीमंत काम चालू आहे घरात असा आवाज ) साल्या घरातलं काम नंतर आगोदर ताबडतोब बाहेर ये

**गणा :** (धावंत प्र. क. ) आत्ताहो ! अव ह्ये काय ? शालन बायसनी खुर्चीला बांधून कशापायी ठेवलायसा ? शालनबाय, अव झालं काय हो तुमचं ? छा. बा ! आज अगदी इपरितच पहातोय मी.

**राजू :** आतां इथं जास्त बोलत थांबू नकोस... अगोदर या चांडाळणीला बेडरूमांतल्या खांबाला करकचून बांधून टाक मरू दे सालीला... माजलीय बकरीसारखी.

**गणा :** ह्ये बघा काय ते ... अव तिला बकरी म्हणू नका तुमी ... अव त्यी तुमची ..

**राजू :** ठाऊक आहे मला . मो सांगतो तेवढं काम कर .. तू सुद्धा माजलाहेस हल्ली – जा सोड तिला. ( तो जावून सोडतो )

**गणा :** ( रडत ) चला, .. चला शालन बाय ... तुम्हासनी म्या सवताच्या हातानी बांधीन असं सपनात देखिल पाहिलं नव्हतं म्या, पन करणार काय नशीबाला... चला चला शालन बाय शीरीमंताची तू दुष्मन असलीस तरी माजी नाय... पन करनार काय म्या आपला गडी मानूस... सांगितलेलं करायचं आणि घातलेलं खायचं.

**राजू :** ए, डचांबीस पोरा. चालता हो तिला घेऊन आत. आलाय मायेचा सागर... खूप पाहिले आहेत मायावाले जा- निघ इथून .

**गणा :** आता म्या नाय म्हनालोय का शिरीमंत – चला शालनबाय.

**शालन :** श्रीमंत – शेवटी मनातला निर्धार कायम ठेवलात तर तुम्ही. ठीक आहे. एवढं सत्य सांगून ज्याअर्थी तुम्ही मला ही घोर शिक्षा देताहा ... त्याअर्थी मला ती मुकाट्यानं सहन करावीच लागणार –कारण सत्याला पायदळी तुडवून असत्यालाच डोक्यावर घेतलंय तुम्ही.

राजू : ए – आता जास्त वटवट करू नकोस गण्या, जा तिला आत घेऊन. ( तिला घेऊन बेडरूममध्ये जातो ) मर आता तिथंच कायमची आज ना उद्या तरी तोंड उघडेल की नाही तुझं ? तो हरामखोर .... डाकू हवाय काय तुला? पाहातो आता त्याची हिम्मत... (बाहेरून रंगा प्र. क.) कोण ? रंगा पाटील.

रंगा : होय श्रीमंत.... कालच येणार होतो आपल्याला भेटायला पण येतां आलं नाही.

राजू : म्हणजे शेवटी तुम्हां दोघानांही सोडून दिलं तर त्या दरोडेखोरानं.

रंगा : तो काय सोडतोय आम्हाला.... आम्हीच पळून आलो तिथून साल्यानं हाल हाल केलेमाझे– पाच सहा दिवस अन्न पाण्यावाचून तडफडत ठेवल न मला.काल रात्री कुणाचोही जाग नाही असं पाहून मोठ्या शिताफीने तिथून पळ काढला. शालन आली नाहीका ?

राजू : आलीय सटवी बांधून ठेवलीय आतल्या खोलीत.

रंगा : बांधून ? म्हणजे ?

राजू : त्या डाकू विक्राळसिंगच्या गुहेत जावून कांहीतरी कारस्थान रचवून आलीय साली. माझ्यावर असलेल्या तिच्या प्रेमाला मी भाळेन अन् तिचा हसतमुखानं बोळवण करीन असं वाटल होतं तिला. पण ती बदल्याखराज मात्र तिला मी मुक्त करणार नाही.

रंगा : मला वाटतं नक्कीच तिचं काही तरी कारस्थान खास असणार– नपेक्षा त्या हरामखोर डाकूची दोस्ती तिनं केलीच नसती विक्राळसिंगनं ज्यावेळी मला दोरखंडानं बांधून गुहेतल्या अंधाऱ्या खोलीत डांबून ठेवलं होतं, त्यावेळा शालन तिथं होती मी शत्रूच्या हातात सापडून माझी तारांबळ उडालेली पाहून तिला खुदकन हसू आलं. त्या वेळो तिचा संताप आला होता पण करणार काय ? मी डाकूचा कैदो होता. माझं प्रामाणिक सांगणे आहे श्रीमंत कि सत्य काय ते कळल्याशिवाय शालनची सुटका करू नका

राजू : छ छे तिची मुक्तता सहजासहजी होणार नाही ते जाउदे ना आणखी काय विशेष खबर गुहेतली ?

रंगा . विशेष म्हणज यम्या बरडानं शरणागती पत्करली आणि तो त्या सैतानाचा दास झाला.

राजू : काय एकतोय हे मी ! यम्या बेरड त्या हरामखोर दरोडेखोराचा दास झाला . . . दास झाला ? अरेरे ! फार वाईट झालं अरे पण एवढा मोठा क्रूर माणूस असा एका-एकी नरम कसा झाला ?

रंगा : तेचं तर खरं आश्चर्य आहे ?

राजू : पण तो असा सहजासहजी विरघळणारा असामी नव्हता ज्यानं आजपर्यंत लाखो जीव आपल्या फरशीच्या एकाच फटकाऱ्याने ठार केले. तो यम्या बे ड त्या शेळपट डाकूवर वार न करता स्वस्थ कसा राहिला. ?

रंगा : पण यम्या गूहेत गेला होता तरी कशासाठी ? अन गुहेतली अवघड वाट त्याला समजली तरी कशी ?

राजू : यम्याला त्या गुहेतल्या साऱ्या चोरवाटा माहित होत्या. म्हणूनच तो बिनधोक तिथं जाऊ शकला. जिवा गारुडानं काहीतरी जादू टोणा करून शालनला डाकूच्या गुहेत पळवली असा माझा दाट संशय होता. त्याच्या मदतीला तो ढेरपोटचा कांचनलाल ही होता त्या दोघानाही ठार मारण्याची जबाबदारी मी यम्यावर सोपविली होती आणि त्याचसाठी तो माळरानाच्या दिशेने गेला असावा. ते दोघेही आपला जीव मुठीत घेऊन माळरानाच्या दिशेने पळत असावे म्हणून यम्याही तिकडे गेला. शिवाय तो डाकू ही यम्याच्या फरशीला बळी पडणार होता. पण सारं विचित्र झालं.

रंगा : मग त्या जिवाची नि कांचनची काय वाट ? ते दडले तरी कुठं?

राजू : मला तरी कसला बोध होत नाही रंगा. मला अस वाटतंय कि त्याना त्याच हरामखोराचं पाठबळ असलं पाहिजे.

रंगा : शक्यता आहे कारण तो गरीबांचा कैवारी म्हणवतो आपणाला. पण श्रीमंत त्याची गुहा जर यम्याला माहीत होती तर पोलीसांना का सुगावा लावलात नाही ? एव्हाना साला अंधार कोठडीची हवा खात बसला असता—. नशीबाला दोष देत !

राजू : नाही — रंगा — मी मुद्दामच पोलीसाना कळविलं नाही कारण जर पोलीसाना कळविलं असतं तर त्याला कुणा ना कुणाकडून तरी सुगावा लागला असता व त्याने राहती गुहा सोडून दुसऱ्या अज्ञात ठिकाणी पलायन केलं असतं. त्या हरामखोराला मीच ठार मारणार आहे एक दिवस.

रंगा : पण .. श्रीमंत असा विचार करीत दिवस वाया घालविण्यात काहीच अर्थ नाही — त्यापेक्षा — काही तरी युक्ति योजून लवकरच त्याचा नायनाट करायला हवा.

राजू : त्याला ठार मारण्याअगोदर.. शालनची झडती घेणं आवश्यक आहे
रंगा : ते तर झालंच – त्याशिवाय पुढंचा मार्ग बिनधोक व्हायचा नाही.
राजू : आता ते सारं नंतर – अगोदर पुष्कळ दिवसानी आज भरपूर प्यायचं .. चल आपण आत बसूया – कालच व्हिस्कीच्या दोन बाटल्या आणून ठेवल्याहेत. ( बेडरुमातून गणा येतो ) गणा ... आत जा आणि लवकर प्यायची तयारी कर. आज भरपूर पिणार आहोत आम्ही.
गणा . ह्ये बघा काय ते ! अव म्या नको म्हणालोय का ? या की (जातो मागोमाग ते दोघे जातात ) प - ड - दा

## प्रवेश २ रा.

स्थळ : रस्ता कांचनलाल घाबरत प्रवेश करतो.

कांचनलाल : मारो - डाकोरजी - मारो मेरे बाप ... मेली त्या झागिरदाराची सत्येनाश व्हयल. शालीनं आमास्नी माराया यमी बेरडाला पाठवली. आमी तर शाली मरणारच हुती, पन ती डाकून आमाला चांगली सरक्षण दिली म्हणून आमी शुटली त्याच्या हातून. नायतर ! हाय मारो बायडी तू रांडवीच व्हनार होतीस. अरी पन त्यो शाला गारुडा कुठं गेली? आता तर आमची बरूबर चालत हुती. ( दूर पहात) ए गारुडा .. ए शाली वेताळा छा . ही बहुधा मेली असनार. पन खरीच जर मेली असली तर आमची शंभर रुपीया गेला खड्यात.

जिवा : (धावत येतो) अरे बाबा तू कुठल्या वाटे आलास?

कांचनलाल : अरे गारुडा कुठली वाटेने म्हणून कय इचारते? तुला थांबनी थांबनी म्हणून अमी वरडली पन तूं शाली धावत सुटली.

जिवा : अरे पलीकडच्या माळरानावर किती वेळ वाट पाहिली मी तुझी तुझा पत्ताच नाही. मग वाटलं तू वाघाच्या नाहीतर एखाद्या अस्वलाच्या तावडीत सापडलास. पण तू तर इथं पोचलास.

कांचनलाल : ए गारुडा आमासनी मारुन टाकते काम शाला ...

जिवा : तसं नव्हे रे, अरे तू माझा दोस्त म्हणून मला तुझी काळजी ... पण काय रे – आता पुढे काय करुया ? विक्रालसिंगाला भेटावं म्हणून गेलो पण त्याचीही भेट झाली नाही – तू कसा आला नाहीस बुवा गुहेत ?

कांचनलाल : आरी तू कवा गेलीस त्येच आम्हाला म्हाईत नाय. कवा गेली तू डाकूकडी ?

जिवा : अरे येतानाच ... मी किती वेळ तुझी वाट पाहिली.

कांचनलाल : आमी शाला भितभित डोंगरातून पळाली . . पन काय रे गारुडा, आमची शंभर रुपीया कवा देणार ?

जिवा : अरे गेले चार दिवस शंभर पैशाची प्राप्ती नाही. तिथं तुझे शंभर रुपये कसे देवू मी ? तरी पण असाच चार दिवस थांब – पुन्हा गावात धंदा सुरू झाला की ताबडतोब तुझे शंभर रुपये देऊन टाकतो.

कांचनलाल : शाली रोज आमाला फशवते काय गारुडा ?आमाला कांचनलाल मारवाडी बडी पोट वाले म्हणते ! मुकाट्यान आमची रुपीया दिली. नाय तर आमी शिदा पुलीश टेशनला जाते शमजली.

जिवा : भिवू नकोस रे– माझा विश्वास नाही का तुला ?

कांचनलाल : आरी इशवास होती म्हणून तर एवढी दिवश आमी थांबली. नाय तर कवाच वशुल केली असती.

जिवा : अरे तू माझ्यावर मुळीच रागावणार नाहीस याची मला खात्री होती म्हणूनच तर मी एवढे दिवस थांबलो. पण आता मात्र तुला असा आशेवर ठेवणार नाही. उद्या परवाच्या दिवसांत सगळी बाकी पूर्ण करून टाकतो.

कांचनलाल : शाबास माजी दोस्ता .. आता आमी तुला नाय बोलते.

जिवा : अरे मला तुझा विश्वास आहे. पण काय रे आता पुढे काय करणार ? गावात फिरताना देखिल जपून फिरलं पाहिजे. तो जहागिरदार जर गाठ पडला तर संपलाच मामला. चल आपण त्या समोरच्या पडक्या घरात थोडा वेळ विश्रांती घेवूया.

कांचनलाल : गारुडा आमाला एक युक्ती सुचला – अगदी च्यांगला.

जिवा : कसली युक्ती सुचली तुला ?

कांचनलाल : आमी वेष पालटून झागिरदाराच्या घरी जायची आनी तिथं काय च्यालली हाय ते बघायची, तुझी कशी काय मत ?

**जिवा :** व्वा रे व्वा कांचनलाल ! तुझी युक्ती मात्र फार नामी आहे खरी पण वेष कसला बरं घ्यायचा ? हं सुचली. मला्ही युक्ती सुचली

**कांचनलाल :** कोनती युक्ती- शांगनी- शांगनी

**जिवा :** मी होतो साधूमहाराज आणि तू हो माझा पट्टशिष्य! दोघेही मिळून जहागिरदाराच्या घरी जाऊया . . . आणि तिथं कसं काय वातावरण आहे ते पाहून येऊया.

**कांचनलाल :** आरी पन गारुडा आमाला झागिरदाराने वळखली तर ?

**जिवा :** छे छे – त्याची मुळीच काळजी करू नकोस – पहा तरी कसा मेकप करतो – फसलाच पाहिजे.

**कांचनलाल :** ( दूर पहात ) आरी मारो बाप – गारुडा, ती बघ बुरखा घेऊन कुणी तरी दोन गुंड इकडे येताहेत – पळनी लवकर पळनी.

**जिवा :** ( पहात ) थांब . तू मुळीच भिवू नकोस . . . . अरे मी जातीवंत गारुडी आहे. काही दगाफटका दिसलाच तर मंतर मारतो आणि साल्याना जागच्या जागी उभे करून ठेवतो. (भैरव व वाघ्या बुरखा घेऊन प्र क.)

**भैरव :** वाघ्या अरे आपलं काम इथंच झालं ..... याच्याकडून जहागिरदाराच्या घरची बातमी मिळवावी. चल पुढे चल.

**वाघ्या :** पण सारं समजावून सांगायला हवंय त्याना. नपेक्षा साराच ब्रम्हघोटाळा व्हायचा.

**जिवा :** कांचनलाल – तू इथंच थांव, मी विचारतो त्याला ( पुढे येत ) ए . बुरखेवाल्यानो – कोण आहात रे तुम्ही आणि असे लपत छपत जाताहा कुठं ?

**भैरव :** तुम्हाला शोधतोय आम्ही –

**कांचनलाल** . आमाला – आमाला – आरी मारो डाकोरजी ! आता ही आमाला ठार मारणार – आमची बायडी रांडवी होणार – आणि आमची शंभर रुपीया भी पाण्यात जाणार – गारुडा आरी गारुडा चलनी, चलनी.

**वाघ्या :** ए — मारवाड्या, कुठं जातोहेस रे पळून ?

**कांचनलाल : यासनी आमची नाव कशी काय समजली ?**

वाघ्या : अरे तुम्हां दोघांचीही नांवं माहित आहेत आम्हांला. तू कांचनलाल मारवाडी आणि हा जिवा गारुडी.

भैरव : चला आता बोलण्यांत वेळ दवडू नका. झटापट जहागिरदाराच्या घरची वाट धरा.

जिवा : म्हणजे तुम्ही . . . त्या विक्राळसिंगचे साथीदार का ?

भैरव : होय. ( दोघेही बुरखे काढतात )

कांचनलाल : अरी ही तर आमची मैतर.

वाघ्या : आता पटली की नाही ओळख.

कांचनलाल : वळख पटला — पन काय रे वाघी.

वाघ्या : वाघी नव्हे वाघ्या.

कांचनलाल : तीच ती – पन तुमी लोग आमाला झागिरदाराच्या घरी कशाला पाठवते ? आरी आमी त्येची दुष्मन हाय – ती शाला आमाला मारेल – आमी मरुन जायेल आनी गारुडाची शंभर रुपीया पाकीट मंदी राहेल.

वाघ्या : तुम्ही वेषांतर करून चला.

जिवा : आम्ही वेषांतर करून जायचं नक्की केलं होतं, पण आतां तुमचं काम काय आहे ते सविस्तर सांगा.

वाघ्या : भैरव, सांग त्याना आमच्या कामाची रुपरेषा

भैरव : या, असे जवळ या माझ्या ( जवळ येतात ) हं . . . आता कामाची कल्पना तुम्हाला देतो. प्रथम वेष पालटायचा.

जिवा : ते आमचं ठरलेलंच आहे. मी होणार साधू महाराज आणि हा मारवाडी माझा पट्टशिष्य! आम्ही मुद्दामच जहागिरदाराच्या घरी जावन यायचं ठरवलं आहे. आता तुमचं काम आहे तेव्हा जायलांच हवं.

भैरव : शाब्बास ! एकूण तुमची योजना आणि आमचा प्रवेश योग्यच झाला म्हणायचा – तुम्ही वेष पालटा आणि तडक जहागिरदाराच्या बंगल्यावर चला. तिथं जाताच सरदारजीविरुद्ध जेवढं बोलता येईल तेवढं बोला, माजलेल्या डाकूला आम्ही ठार मारतो असं त्याला भासवा व त्यासाठी बालनला ताब्यात करण्याची विनंती करा – तिला त्यानं आप-

त्याच बंगल्यात बांधून ठेवली आहे अशी बातमी एका खास माणसानं रात्री माळरानावर येवून आम्हाला दिली. शालनला तो तुमच्या ताब्यात देण्यास राजी होणार नाही. तेव्हा तुम्ही सांगा की तिच्याशिवाय त्या हराम-खोर डाकूला मरण येणार नाही.

जिवा : आता पुढचं काहीही सांगू नका- असं नाटक रंगवतो की ज्याचं नाव ते - चल रे मारवाड्या.

भैरव : सारं काम दक्षतेने होऊ दे हं ! कुठेही हवा घालवू नका.

जिवा : छे - त्याची काळजीच सोडा तुम्ही

कांचनलाल : चल नी गारुडा - आमांला मेकप करायची हाये - चल नी.

जिवा : चल - चल लवकर - अच्छा येतो आम्ही दोस्तानो.

वाघ्या, भैरव : चला विजयी व्हा. ( दोघे जातात )

भैरव : बस्स ! एक महत्त्वाचं कार्य तरी सिद्धीला गेलं धडपड केल्या सारखी गोवाडीची खेप मात्र फुकट गेली नाही.

वाघ्या : चल. आता वेळ न दवडता सरदारजींची भेट घेऊन त्यांना ही आमची योजना सांगूया.

भैरव : सरदारजी आमची वाटच पहात असतील.

वाघ्या : पण काय रे भैरव, या दोघाना तो हरामखोर जहागिरदार संश-यानं पकडणार तर नाही ना ?

भैरव : अरे त्याची काय ताकद आहे त्याना हात लावायची आणि तू म्हण-तोस तसं काही घडलंच तर - पण नको यावेळी सारंच बोलून संपवित नाही मी. त्या हरामखोर जहागिरदानं मुकाट्यानं शालनची मुक्तता जर केली नाही - तर तो प्राणालाच मुकला असं समज. चल, सरदारजी आपली वाट पहात असतील - ( दोघे जातात )

— प ड दा —

# प्रवेश ३ रा

स्थळ : राजू जहागिरदाराचा बंगला – सर्वत्र साम-सूम आहे. ( बाहेरून राजू व रंगा प्र. क. )

राजू : रंगा- आता क्षणाचाही वेळ न दवडतां अगोदर त्या बेईमान शालनची जबानी घ्यायला हवी. आजही ती सटवी नाही वदली तर मात्र कुत्र्याच्या मौतीनं तिला ठार मारायची. फार माजलीय हरामजादी विक्राळसिंग हवाय काय सालीला ?

रंगा : श्रीमंत ... असल्या विश्वासघातकी बायकांवर कधीही विश्वास ठेवू नये. मी तिचा स्वभाव मागंच ओळखलाय. त्याबद्दल तुम्हालाही कल्पना दिली होती मी.

राजू : मी एवढा विश्वास ठेवता कामा नये होता तिच्यावर. पण मी फसलो गेलो... माझं प्रेम मी तिला दिलं - वरती पैशाची उधळण केली. शेवटी मला मिळालं काय ? काही नाही. माझ्या नाशाची कारस्थाने मात्र सटवीने केली. त्या हरामखोर डाकूच्या गुहेत राहून ! पण तिचे सारे डाव उलथून टाकले या राजू जहागिरदाराने! आज पाठीची चामडी निघेपर्यंत चोपून काढणारेय सालीला. एवढे दिवस शालन माझी प्राणदेवता होती, पण आज तीच शालन माझ्या प्राणावर आघात करु पहातेय. नक्कीच डाकूच्या सहवासात ती भ्रष्ट झाली असणार. अशा कुलटेला जिवंतच ठेवतां नये

रंगा : मग वेळ दवडण्यात अर्थ नाही श्रीमंत.

राजू : चला ... शुभस्य शीघ्रम् ... गण्या – अरे ए गण्या.

गणा : (प्र. क.) ह्ये बघा काय त्ये ! आई वडलानी चांगलं गणाधीश नाव ठेवलं आनी तुमी आपलं गण्या-गण्या करतायसा ! आता म्हणावं काय तुम्हासनी ?

राजू : श्रीमंत म्हण – जहागिरदार म्हण – न पेक्षा लँडलॉर्ड म्हण.

गणा : काय म्हनतायसा लड-लड.

रंगा : अरे ए गणा – लड-लड नव्हे – लँडलॉर्ड – मोठे श्रीमंत.

**गणा :** त्येंच की . . . अव आमी अज्ञानी मानसं, आमासनी कुठं कळतंय नीट बोलाया.

**राजू :** आता तुझी वटवट नको, तावडतोब शालनला घेऊन ये आमच्या समोर.

**गणा :** ह्ये बघा काय त्ये. अव म्या नाय म्हनालोय का कवा ? पन काय हो लडलड.

**राजू :** लडलड नव्हे साल्या लँडलॉर्ड

**गणा** : त्येच, अव म्या आपला गडी मानूस. हं (आठवून) काय म्हनत हूतो. हं आठवलं . . . शालन बायस्नी तुमच्या म्होरं कशापायी आणावा होवी ?

**राजू** : त्या चौकशा तुला नकोत. चालता हो सांगितलेल्या कामाला.

**गणा** : आत्ता हो ... अव ह्य काय निगालो – पन पन.

**राजू :** (ओरडून) गण्या ... पन–पन काय करतोस – चालता हो

**रंगा** : पन बीन काही नाही – चालू लाग इथून. ( जातो )

**राजू :** ह्यालासुद्धा चाबकाचे फटकारे बसायला हवेत – जास्तच फाजील झालाय हल्ली. ( बाहेरून जिवा व कांचनलाल साधूच्या वेषात येतात – वाढलेली दाढी–कफनी–हातात कमंडलू–झोळी )

**जिवा :** जय शिरडीपती – जय साईबाबा – जय अलख निरंजन

**राजू :** ए गोसावड्या – लाज नाही वाटत भीक मागायला ?

**रंगा :** चांगला धडधाकट तर दिसतोयस, काम करून खायला काय होतंय, दिवसा भीक मागतात आणि रात्री चोऱ्या करतात साले.

**जिवा :** जय साईनाथ – जय शिरडीपती.

**राजू :** ए साईभक्ता – कशाला गुणगान गातो आहेस त्या ढोंगी देवाचं ? तुझा देव सर्वांना आंगठ्या देतो. मला घेऊन या पाच-पन्नास मागून– म्हणे जय साईनाथा.

**कांचनलाल :** गुरुदेव - आपून दुसऱ्या घराला जावूया. इथं आमच्या बाबांची निंदा करतात हे लोक.

**जिवा** : निंदकाचे घर असावे शेजारी . . . अशी म्हणच आहे संताची ! अरे कुणी निंदा कुणी वंदा आमचा स्वहिताचा धंदा.

राजू : तुमचा धंदा कसलाही असो. इथं तुम्हाला काहीही मिळणार नाही. आलात तसे चालते व्हा मुकाटयानं नपेक्षा फोडून काढीन दोघांचीही पाठ!
जिवा : जय साईनाथ - पण बाबा आम्ही भिक्षेसाठी आलो नाही तुमच्या घरी.
राजू : तर कशासाठी आलाहांत तुम्ही ?
जिवा : तुमच्यावरचं संकट निवारण करण्यासाठी.
राजू : (आश्चर्य) आमच्यावरचं संकट ?
जिवा : बाबाजी, कालच मी ध्यान लावून बसलो असता, मला तुमच्या वरील संकटाची कल्पना आली. आणि म्हणूनच मी माझ्या पट्टशिष्याला बरोबर घेऊन मुद्दाम इथ आलोय. आपली परवानगी असेल तर मी पुढे बोलतो.
रंगा : श्रीमंत - ऐकून तरी घेऊया याचं बोलणं.
राजू : हं सांग — माझी परवानगी आहे तुला पण सारं खडान् खडा सांगितलं पाहिजे हं
जिवा : ( पुढे येत ) जय साईनाथ — जय शिरडीपती — बाबाजी आपलं शुभ नाव राजू असं आहे. होय ना ?
राजू : होय —
जिवा : तुम्ही फार मोठे श्रीमंत आहात. तुमच मन एका बाईवर जडलं होतं ... पण तिनं तुमचा विश्वासघात केला. ती तुमच्या एका महान शत्रूला सामील झाली.
राजू : रंगा - अरे हे तर सारं खरं आहे.
रंगा : हो ना - यात अक्षरही खोटं नाही.
राजू : पण कायरे साईभक्ता, यातुन काही मार्ग सांपडेल का मला ?
जिवा : थांबा-थोडा वेळ ध्यान लावून पहातो.बसायला परवानगी आहे का?
राजू : हो - हो - बसा - बसा ना या सोफावर.
जिवा : जय साईनाथ बाबाजी आम्हीं साईचे परमभक्त आहो. उंचावर कधीच बसणार नाही (खाली मांडी घालून बसतो ) सत्यप्रसाद अरे बैस ना माझ्या जवळ .. अरे घर आपलंच आहे.

कांचनलाल : ( बसतो ) जय गुरुदेव – जय साईदेव.

राजू : अरे पण तुमचा मुक्काम कुठं असतो ?

जिवा : जय साईनाथ बाबाजी—आमचा मुक्काम पावसाळ्यात शिरडीला असतो— इतर दिवस फिरतीवर असतो.

राजू : अस्सं काय ! हं लावा तुमचं ध्यान ( जिवा डोळे मिटून काही वेळ शांत असतो – दोघांचही लक्ष त्याच्यावर खिळून असतं – काही वेळान )

जिवा : बाबाजी-बाबाजी ... सांपडला. उत्तमपैकी मार्ग सांपडला ! शत्रूला कायमचा चीत करण्याचा मार्ग सांपडला पण ...

राजू : पण– पण काय ?

जिवा : त्या साठी शालन नावाच्या एका तरुण स्त्रीला आमच्या बरोबर पाठवावी लागेल. कारण उन्मत्त असुराला ठार मारायचा असेल तर स्त्रीचीच गरज आहे.

राजू : शालनचं का ? दुसरी एखादी नाही चालणार?

जिवा : नाही बाबाजी ... मला ध्यानात दिसलं ते मी सांगितलं— यात माझी अतिशयोक्ती नाही.

राजू : नाही – नाही शालनला मी तुमच्या ताब्यात देऊ शकत नाही. ज्या अर्थी तुम्ही तंतोतंत बातमी सांगताहा त्याअर्थी तुम्ही शत्रूचे हेरच असायला हवेत. रंगा या दोघांचीही झडती घे बघू.

जिवा : नाही-नाही आम्ही हेर नव्हे आम्ही—आम्ही –

रंगा : ( कांचनलालची दाढी काढीत ) श्रीमंत – श्रीमंत अहो हा आपला कांचनलाल मारवाडी.

कांचनलाल : नाय – नाय आमी मारवाडी नाय.

राजू : साल्या पुढं बोलू नकोस – ज्याअर्थी हा मारवाडी निघाला त्याअर्थी हा नक्कीच जिवा गारुडी असला पाहिजे. ( त्याची दाढी काढतो ) अरे चोरानो आम्हाला फसवायला आला होतात काय – थांबा तुम्हाला डांबूनच ठेवतो खोलीत. रंगा, या दोघाही संन्याशाना बेड-रुमातल्या खांबाला नेऊन बांधून ठेव. ( ते प्रतिकार करीत असतात पण रंगा त्याना ओढीत नेतो) आणि गणाला शालनला घेऊन यायला सांग.

रंगा : चला रे चोरानो (आत नेतो)

राजू : वारे तुझी विक्राळसिंग ! बराच खेळतोहेस माझ्याशी– पण साल्या आतां तुझे दिवस भरलेत ( गणा शालनला आणतो )

गणा : म्या जावू का आंत .. शिरीमंत ?

राजू : हो तुझं कांहीही काम नाही इथं- (गणा जातो) ए .. सटवे, आज एक छान गाणं ऐकणार आहे मी तुझ्या मुखातून ... म्हण ... एखादं चांगलं ... गाणं ..

शालन : श्रीमंत–श्रीमंत का असा छळवाद मांडलात माझा ?

राजू : (चाबूक काढतो) साले, आता मुकाटयानं म्हणतेस की नाही गाणं.

शालन : नाही – नाही मला शक्य होणार नाही.

राजू : ( मारीत ) पुन्हा सांग – नाही म्हणून, म्हण ( मारतो ) म्हण लवकर ( दु:खी मनानं शालन गाणं म्हणते )

॥ पद ॥

यौवन माझे वहरुन आले
वसंत माझ्या हृदयी खेळे ॥ धृ ॥
धुंद लोचनी तुम्हां पहाते
सागर- सरितेचे हे नाते
दासी तुमची चरणी लोळे ॥ १ ॥

हं... आतां सांग.. का गेली होतीस त्या हरामखोर डाकूच्या गुहेत ?

शालन : (रडत) श्रीमंत-श्रीमंत.. का उगाच संशय घेताहां माझा? खरंच मी कसलंही कारस्थान केलं नाही ? मी निष्पाप आहे.

राजू : (मारीत) निष्पाप – अन् तू – वारे व्वा तुझी !

शालन : (विव्हळत) नका –नका श्रीमंत –मला मारू नका – थोडी तरी दया दाखवा – मी – मी खरंच गुन्हेगार नाही हो !

राजू : ( मारीत ) काय – काय– म्हणते आहेस सटवे ? दया ? नाही, नाही शालन – तुला दया–क्षमा काही नाही. अस्सा मारीत राहणार तुला तू वदेपर्यंत ( राजू तिला मारीत असतो, ती विव्हळत जमीनीवर पडते, तो मारीतच असतो ) प – ड – दा.

## प्रवेश ४ था.

स्थळ : विक्राळसिंगची गुहा - विक्राळ कुणाची तरी वाट पहातोय.

**विक्राळसिंग :** भैरव आणि वाघ्याचा अजून कसा पत्ता नाही ? मारवाडी न गारुडी सापडले की नाही देव जाणे पण माझ्या अंदाजाप्रमाणे हे दोघेही एवढ्यात यायला हवे होते. (बाहेरुन वाघ्या प्रवेश करतो ) वाघ्या तू एकटाच आलास ? भैरव कुठं आहे ?

**वाघ्या :** येतोय मागाहुन मला वाटतं एव्हाना तो जाईदेवीच्या मंदीरा-जवळ पोचला असेल.

**विक्राळसिंग :** जिवा–कांचनलाल भेटले की नाही .. ?

**वाघ्या :** होय सरदारजी ... दोघानाही वेष पालटून जहागिरदाराच्या घरी पाठवले आहेत.

**विक्राळसिंग :** आता नक्कीच शालनची खरी बातमी आम्हाला कळणार. ऐकलंस वाघ्या, हे मला पूर्वीच माहित होतं. शालनला मी तसे म्हणालोही होतो – माझा अंदाज चुकला नाही वाघ्या. शेवटी त्या हरामखोर जहा-गिरदारानं पेटत्या आगीत तेल ओतलंच.

**वाघ्या :** त्याचं मरण आता अटळ आहे सरदारजी. मुद्दामहून त्यानं आमंत्रण केलय मृत्यूला ..

**विक्राळसिंग :** तो यापुढे जिवंत राहूच शकणार नाही वाघ्या. या विक्राळ-सिंगच्या हातून त्याला मरण येणारेय .. पण त्या अगोदर त्या सैतानाला वदवला पाहिजे. आबासाहेबांचा निर्घृण खून कुणी केला हे मला कळलं पाहिजे. तो वदला तर ठीक न पेक्षा –

**वाघ्या :** सरदारजी, मला एक शंका येतेय

**विक्राळसिंग :** कोणती ?

**वाघ्या :** जहागिरदारानं पोलीसाना एन. सी. दिली तर.

**विक्राळसिंग :** तेवढी धमक नाही त्या शेळपट कुत्र्याच्या अंगात... तो काय देतोय पोलीसांत एन. सी.! या डाकूला पकडणं तेवढं सोपं काम नाही वाघ्या.पोलीस काय, पण त्यांचा बापही या विक्राळला पकडू शकणार नाही.

**वाघ्या :** सरदारजी- जिवा व कांचन शालनची खबरबात काढून थोड्या वेळाने इकडे येतील. आम्ही शक्यतो तिला घेऊन येण्याबद्दल सांगितलंय. थोड्या वेळाने गुहेच्या बाहेर नजर ठेवायला हवी.

**विक्राळसिंग :** मला नाही वाटत तो माथेफिरू सैतान शालनला त्यांच्या-बरोबर पाठविलंस. त्याची पक्की बदमाषगिरी मीच काढणारेय बाहेर.

**वाघ्या :** अजून भैरवचा कसा पत्ता नाही ?

**विक्राळसिंग :** तो फार चतुर माणूस आहे. सहजा-सहजी कुणाच्याही हाती लागणार नाही ( बाहेरून भैरव व गणा येतात ) हा बघा भैरव आलाच. अरे पण हे काय ? जहागिरदाराचा नोकर या सोबत कसा ? काय रे भैरव हा गणा इथ कसा ?

**भैरव :** सरदारजी, माळरानावरून मी एकटाच येत होतो इकडे, इतक्यात हा लांबून मला धावत येताना दिसला.

**विक्राळसिंग** : का येत होता तो धावत ?

**भैरव** : तुमच्या आश्रयाला आलाय म्हणे तो – शिवाय एक खळबळजनक बातमीही आणलीय त्यानं – आम्ही केलं एक अन् झालं भलतंच !

**विक्राळसिंग :** ( आश्चर्याने ) काय झालं भैरव ?

**भैरव :** हा गणा सांगेल तुम्हाला.

**विक्राळसिंग** : काय रे गण्या ... काय झालं ?

**गणा :** सरदारजी, जिवा आनि कांचन या दोघासनी झागिरदारांनं बांधून ठेवलंया समद्यांचा डोळा चुकवून म्या ईकडं धांवलो.

**विक्राळसिंग** काय ! जिवा-कांचन याना जहागिरदारानं बांधून ठेवलंय ? ठीक आहे ! एवढं धाडसं करून ही बातमी आमच्या कानापर्यंत घालण्याचं धाडस केलंस या बद्दल तुझे आभारी आहोत.

**गणा :** सरदारजी एक इनंती हाय दासाची

**विक्राळसिंग :** बोल कसली विनंती आहे तुझी ?

**गणा** : आमचे मालक लई तिखट मानूस हायत. तवा म्या आपला तुमची-करच राहतो. येळप्रसंगी मसनी बी ठार माराया कमी करणार नाय त्यो सैतान.

विक्राळसिंग : भिवू नकोस गणा - आजपासून तू आमचा आहेस. तुझ्या जिनगानीची जबाबदारी यापुढे माझ्यावर राहील. भिवू नकोस तू. वाघ्या, भैरव यापुढे एकच निर्धार - उद्याचा सूर्य अस्ताला जाण्याअगोदर एक मी तरी मरेन- न पेक्षा त्या उन्मत्त राजू जहागिरदाराला तरी कंठस्नान घालीन ( पडदा )

## प्रवेश ५ वा.

स्थळ : राजू जहागिरदाराचा दिवाणखाना. राजू शालनला चाबकाचे फटकारे मारीत आहे. ती विव्हळतेय

शालन : ( दुःखाने ) नका-नका श्रीमंत-पदर पसरते मी तुमच्यासमोर प्राणांची भिक घाला मला... असे जिवघेणे फटकारे मारू नका माझ्यावर

राजू : ( मारीत ) मारू नका... सटवे .. तुझे हाल-हाल करून मारणारेय मी तुला - (मारतो)

शालन : (विव्हळत) ... देवा... दयाघना तुलाही कशी कणव येत नाही रे या अभागिनीची ? तू सुद्धा कोपलास का रे माझ्यावर.

राजू : (मारीत) मर-मर चांडाळणी अशीच मर कुत्र्याच्या मौतीनं.

शालन : (विव्हळत) हाय. हाय माझ्या दुर्दैवा ! नाही... नाही.
सहन होत नाही मला या यातना - आई ग .. आई ...

॥ पद ॥

( गाणं चालू असताना राजू मारीत असतो )

धावत ये रे तू यदुराया
जळते माझी सारी काया ॥ ध्रु ।
असह्य होती मला यातना
का मजलाही मरण येईना
अंत किती तू बघसी सखया ॥ १ ॥

राजू : ( मारतो ) का धावा करते आहेस देवाचा ... ? तो कदापिही येणार नाही तुझ्या मदतीला ... ( मारतो ) कुलटे ... अशीच मरून मरून जा तू माझ्या हातून!

शालन : (दु:खाने) श्रीमंत-श्रीमंत नाही हो सहन होत मला या यातना.. त्यापेक्षा बंदुकीची एकच गोळी घालून जागच्या जागी ठार मारा मला. पण असा जिवघेणा मार देऊ नका. देवा... देवा... धांव रे माझ्या राजा ! सोडव रे मला ह्या सैतानाच्या हातून.

राजू : ( मारतो) मी . मी... सैतान ? शालन तुझी जीभ बेताल सुटली आहे. पण लक्षांत ठेव तुझे-हाल-हाल करूनच मी मारणारेय तुला... ( मारतो – ती विव्हळते– इतक्यात बाहेरून डाकू विक्राळसिंग– भैरव– वाघ्या व गणा येतात )

विक्राळसिंग : हा खबरदार राजू, – हातातला चाबूक मुकाट्यानं खाली टाक. ( बंदूक रोखून ) नपेक्षा बंदुकीची गोळी आरपार घुसवली जाईल.

राजू : ए चोरा, का आलाहेस इथं एवढी फौज घेऊन ? आणि हा गणा तुझ्याबरोबर कसा ?

विक्राळसिंग : तो माझा माणूस आहे. त्यानंच सारी बातमी पुरवलिय मला.

राजू : काय ऐकतोय हे मी .. गणा तुला सामील झाला ?

विक्राळसिंग : ए-आता वट-वट नकोय तुझी .. बऱ्या बोलानं शालनची मुक्तता कर. . . जिवा कांचनला सोडून दे आणि परमेश्वराचं नांव घेऊन माझ्या समोर उभा राहा.

राजू : नाही - नाही मी कुणालाच मुक्त करू शकणार नाही आणि या सटवीला तर मुळीच नाही ( मारतो )

विक्राळसिंग : ( झडप घेऊन चाबूक घेतो ) साल्या एवढी हिम्मत आहे का तुझी? बोल तिघानाही मुक्त करणार आहेस की नाही.

राजू : नाही - नाही

विक्राळसिंग : ( फटकारा मारीत ) काय म्हणालास ? नाही ?

राजू : खबरदार ! चोरा मला मारशील तर !

विक्राळसिंग : ए जास्त वात्रटपणा नकोय तुझा ( मारतो ) साल्या फार

माजलाहेस डुकरासारखा! वाघ्या भैरव या हरामखोराला पकडा तावडतोब
( ते धावत येऊन राजूला पकडतात )

राजू : अरेरे ! शेवटी असा विश्वासघातानं गळा कापलात काय माझा ?

विक्राळसिंग : याला बेडरुममध्ये बांधून टाका – आणि जिवा-कांचनची मुक्तता करा. चला, चला याला घेऊन. ( ते राजूला घेऊन बेडरुमात जातात. विक्राळ शालनला सोडवतो ) गणा तू आत जावून खान्याचं बघ.

गणा : अव त्ये काय सांगाया होवं ? चहा करं की दुध...

विक्राळसिंग : साधा चहा पाण्यानं काही होणार नाही... खमंग जेवणाची तयारी कर . ( बरं-बरं म्हणत जातो ) शालन, मी तुला अगोदरच या संकटाची कल्पना दिली होती. माझा अंदाज कदापिही खोटा ठरत नाही गणानं सारी बातमी गुहेत पोचवली म्हणूनच मी येवू शकलो शालन.

शालन : भय्या श्रीकृष्णासारखा आलास बघ धावत ! जहागिरदारानं एकसारखा सपाटा चालवला होता मारण्याचा. तू आज आला नसतास तर काही माझी घडगत नव्हती ..

विक्राळसिंग : सगळ्या पापाचं माप आज मी पदरात घालणार आहे. त्याचा मला सूड उगवायचाय माझ्या आबाच्या खुनाचा...

शालन : तुझे आबा... ? म्हणजे समजले नाही मी...

विक्राळसिंग : आज सारं सारं काही सांगणारेय मी तुला शालन. मी हे डाकूचे जीवन का जगत होतो याचा उलगडा करणारेय मी आता. . ती अंधारी अवसेची काळीकभिन्न रात्र होती.. ! रातकिड्यांचे कर्कश आवाज वातावरण गढूळ करीत होते वाड्यात जीवघेणी शांतता पसरली होती ! मी बेडरुममध्ये शांत झोपी गेलो होतो. दुपारी झालेल्या भांडणानं माझी मनःस्थिती ठीक नव्हती. राजूनं आबांसमोर मला बेदम मारलं होता. आबा राजूच्या सांगण्याप्रमाणे इस्टेटीची वाटणी करीत नाही म्हणून तो चवताळलेला होता. आणि त्या भरांत आबाना व मला त्यानं मारहाण केली. त्यादिवशी घरांतलं वातावरण अबोल भकास होतं मी रात्री उपाशीच झोपायला गेलो होतो. झोप येत नव्हती बिछान्यावर तळमळत होतो एकसारखा. राजू रात्री आठच्या दरम्यान घरांतून निघून गेला

होता. घड्याळानं रात्रीच्या एकचा टोला दिला व ते पुन्हा टिक् टिक् करू लागले . बाहेरच्या दरवाजाला राजूनं कुलूप लावलं होतं. फुटक्या माठातलं पाणी झिरपावं तशी रात्र सरत होती ... राजूनं चोर पावलानी दार उघडलं -तो आत आला- त्याच्या तोंडावर भेसूर छटा तरळत होत्या हातातला रामपुरी चाकू - आबाच्या बिछान्याजवळच्या सौम्य दिव्याच्या प्रकाशात एकदाच चमकला आणि दुसऱ्याच क्षणी राजूनं - काळासारखी आबावर झेप घेतली - रामपुरी चाकू आबांच्या छातीत घुसला, मरणाच्या यातनेनं त्यानी एकदाच किंकाळी मारली - आणि दुसऱ्याक्षणी सारं शांत निःशब्द झालं.

**शालन** : अरेरे ! केवढा हा प्रसंग. मग यापुढे काय झालं भय्या ?

**विक्राळसिंग** : आबांना रक्ताच्या थारोळ्यात टाकून तो बदमाश माझ्या बेडरूममध्ये धावला. त्याने आपल्या जवळचा रामपुरी चाकू रक्तानं माखलेल्या स्थितीतच माझ्या अंगरख्यात दडवला ! हेतू हाच की, आबाच्या खुनाचा आरोप माझ्यावर यावा. मी हे सारं अवाकपणे पाहातच होतो एखाद्या निर्जीव पुतळ्यासारखा- तो मला दोषी ठरवू पाहात होता- आणि झालंही तसंच ! या आरोपाखाली मला पोलीसानी अटक केली. अंधाऱ्या भयाण कैदखान्यात माझे दिवस जावू लागले. एके दिवशी मला खून चढला. सारी शक्ती एकवटून मी कैदखान्याच्या खिडकीचे गज वांकवले. समोर जेलर उभा होता पुतळ्यासारखा- मी धांवलो- काढली त्याच्या हातातली बंदूक - मारली त्याच्या छाताडात गोळी आणि वाट फुटेल तिकडे धावत सुटलो ! त्याच दिवशी गावची जत्रा होती. मी देवळाच्या मागच्या गर्दीत होतो. इतक्यात एक किंकाळी मी ऐकली. धावत आलो देवळात तिरासारखा ! तिथं तू होतीस एका गुंडाच्या हातात सांपडलेली. त्याचा समाचार घेऊन मी तुझी मुक्तता केली त्या दिवसापासून तू मला विक्राळ भय्या मानू लागलीस, पुढे मी डोंगरमाथा धरला ... गुहेत राहू लागलो. श्रीमंताविरुद्ध बंड पुकारलं. गरिबांचा देव झालो.

**शालन** : किती गुंतागुंतीची आहे रे तुझी कहाणी.

**विक्राळसिंग** : होय शालन फार गुंतागुंतीची आहे माझी कहाणी. माझं खरं नाव माहीत आहे का तुला ?

**शालन :** नाही– तू विक्राळसिंग आहेस एवढंच मला माहित आहे, तूच मला तुझी गुहा दाखवलीस, नाव ही सांगितलंस आणि प्रसंगी धावूनही आलास.

**विक्राळसिंग :** माझं खरं नाव शेखर जहागिरदार असं आहे शालन. विक्राळसिंग या टोपण नावानं गेली चार वर्षे गुहेतल्या अंधाऱ्या खडकाळ जागेत जगलो मी वाघासारखा.

**शालन :** काय ? तू जहागिरदार आहेस ! म्हणजे राजू ...

**विक्राळसिंग :** तो माझा थोरला भाऊ आहे शालन, पण आज तो माझा दुष्मन आहे साता जन्मीचा. आबांच्या खूनाचा सूड घ्यायचाय मला. मी आज ठार मारणारेय त्याला.

**शालन :** भय्या माझं ऐक. तो आबाचा खुनी असला तरी एकवेळ क्षमा कर त्याला ... त्यानं माझेही हाल... हाल केले असले तरी तो माझा प्रियकर आहे ... आज ना उद्या त्याच्याशी संसार थाटणारेय मी

**विक्राळसिंग :** आजन्म कुंवार रहा शालन .. पण हे नसतं वेड लावून घेऊ नकोस. राजूला मी ठारच मारणार आहे. ज्याने माझ्या आबांच्या य:कश्चित जमिनीसाठी . मुठभर संपत्तीसाठी निर्घृण खून केला. त्या सैतानाला मी कालयत्रीही जिवंत सोडणार नाही. खुन्याना शासन हे जरूर मिळालं पाहिजे ( बेडरुमकडे जात ) वाघ्या, भैरव घेऊन या बाहेर त्या हरामखोर खुन्याला ( राजूला आणतात ) बोल जहागिरदार, आबांचा खून कुणी केला ?

**राजू :** मरणाच्या दारी असलो तरी खोटं बोलणार नाही. आबांचा खून शेखरने केला ...

**विक्राळसिंग :** तोच शेखर जहागिरदार आज तुझ्या पुढ्यात आहे. साल्या ( बंदुक रोखून ) बोल... कुणी केला आबांचा खून ?

**राजू :** म्हणजे - म्हणजे तू तू शेखर आहेस ? डाकू - सैतान आहेस तू !

**विक्राळसिंग :** तूच बनवलाहेस मला डाकू... तुझ्यामुळेचं सैतानाचं जिणं जगतोय मी... गरिबांच्या माना मुरडून तिजोरी भरली आहेस तू– आया बहिणींची अब्रू लुटून त्यांच्या जीवनाच मातेर केलं आहेस तू. बोल प्राणजाताना तरी खरं बोल.

अ : नाही- आबांचा खून मी केला नाही.

काळसिंग : ठीक आहे मग कान उघडे ठेवून ऐक. आबाचा निर्घृण खून करताना ह्या बेडरुममधून तुला पाहिलाय मी – तूच रामपूरी चाकू माझ्या अंगरख्यात लपवला होतास – खूनाची फिर्याद पोलीस चौकीवर तूच दिली होतीस – माझ्या कमनशिबानं मी पकडलो गेलो. पण डोक्यात खून चढताच जेलरचा खून करून कैदखान्यातून पोबारा केला आणि थेट जाईच्या माळरानावर म्हसोबाच्या सान्निध्यात असलेल्या अवघड गुहेत 'डाकू विक्राळसिंग' या टोपण नावानं आयुष्याचे क्षण घालवू लागलो. मागे एकदा तुला या खुनाबद्दल मीच स्वतः येऊन इशारा दिला होता. पण त्यावेळी तुझे अन्याय भरले नव्हते. आज सर्व अन्यायाची पुरेपुर बेरीज झालेली आहे. बोल आबांचा खून कुणी केला ?

राजू : मी नाही केला. उगाच बोंबा मारु नकोस माझ्या नावानं!

विक्राळसिंग : अस्सं ( मग घे तर देवाचं नांव आणि तयार हो मरणाला. माझ्या स्वर्गस्थ आबासाहेबांच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून आज मी त्यांच्या खुनाचा बदला घतोय ( क्रोधानं बंदुकीचा चाप ओढतो. राजू मोठ्याने ओरडत खाली कोसळतो ओरड ऐकून बेडरुमातून जिवा- कांचन धावत येतात. आतून गणाही धावत येतो. )

गणा : हे बघा काय ते. संपलाच की हो मामला !

शालन : भय्या-भय्या काय केलंस हे .. ? काय केलंस.

विक्राळसिंग : योग्य तेच केलंय मी शालन. अपराध्याला शासन हे मिळायलाच हवं. जिवा-कांचन, चला पळा इथून लवकर (बाहेरून पोलिसांच्या शिट्ट्यांचा कर्कश आवाज) पळा-पळा लवकर. पोलीस नक्कीच माझा वास काढीत जवळपास आलेले आहेत. ( कांचन-जिवा पळतात. कांचनचा 'आवाज' गारुडा-गारुडा माजी शंभर रुपीया, माजी शंभर रुपीया ) (शिट्ट्यांचा आवाज) चलनी चलनी गारुडा, गणाभाय तू भी चल आमची बरुबर ( गणा, कांचन, जिवा जातात. ) वाघ्या भैरव तुम्ही सुक्षेम गुहेची वाट धरा. मी आलोच लगेच ( ते जाऊ लागतात, पण समोर इन्स्पेक्टरला व पोलीसाना पाहून दचकून मागे येतात ).

इस्पेक्टर : ए- गुंडानो- कुठे पळून जाण्याचा प्रयत्न करताहां ? जाधव जाधव, अगोदर याना ताब्यात घ्या ( पोलीस त्याना बेड्या घालतो ) चला याना नेवून बाहेरच्या जीपमध्ये घाला. तोपर्यंत मी हा रेडा काय करतोय ते पहातो (जाधव त्याना नेतो) ए पळपुट्या लांडग्या, काय रे ? काय चालवलसं आहेस इथं ?

विक्राळसिंग : इन्स्पेक्टर साहेब. यावेळी फक्त माझ्या हातात बेड्या घालण्याचं कर्तव्य तुम्ही करा. मला जे काही सांगायचं असेल ते मी कोर्टांत सांगेन. तुम्हाला मी एवढंच सांगू शकेन की हा जो हरामखोर इथं मरुन पडला आहे. त्याला मी स्वतः माझ्या बंदुकीच्या गोळीनं गारद केलेला आहे. मी खुनी आहे. कोणत्याही क्षणी हंसत हंसत फासावर जायची तयारी आहे माझी ! चार वर्षे दरो-खोऱ्यातून भटकत होतो. ते पाषाण त्यावेळी माझी व्यथा जाणून घेत.ज्या पश्चात्तापाने सोन्यासारख्या संसाराचा मी त्याग केला त्याचं फळ मला मिळालं. याच संधीची वाट पहात होतो मी घाला, खुशाल बेड्या घाला माझ्या हातात. ( दोन्ही हात जोडून पुढे येत )

शालन : भय्या, भय्या हेच चरित्र पहाण्यासाठी का रे मला जिवंत ठेवलीस?

विक्राळसिंग : माझं एक स्वप्न आहे शालन, ते पूर्ण करायला हवंय: आणि म्हणूनच तुला या जगात जगलं पाहिजे. माझं स्वप्न आहे ते फार वर्षापासून हृदयाच्या गाभाऱ्यात जोपासलेलं. आजपर्यंत मी डाके घातले, लूटमार केली, बड्यांचे खून केले. पण स्वतः करोडोपती होण्याच्या इच्छेनं मी हे केले नाही. या मागे निराधार-गरिब-अनाथ अपंगाचे हुंदके होते. आजपर्यंत मिळालेली सारी रक्कम मी दान करीत आलो आहे. यापुढे माझं अधुरं स्वप्न आहे आणि ते म्हणजे अनाथ अपंगाना शिक्षण देणं-त्यांची सेवा करणं. आज मी खुनी आहे. फासाचा दोर माझ्या गळ्यापर्यंत पोचलेला आहे. कांही क्षणांचा मी सोबती आहे या जगात एवढं माझं स्वप्न तू पूर्ण करशील तरच फासावर जाताना मला फार मोठा आनंद होईल-नपेक्षा त्या वेदना सहन होणार नाहीत मला.

इन्स्पेक्टर : ए चल आटप तुझं पुराण- वेळ होतोय मला.

विक्राळसिंग : मी ही तेंच म्हणणार होतो इन्स्पेक्टर साहेब. एवढा वेळ एक आरोपी- आणि तोही एक असामान्य दरोडेखोर तुमच्या पुढयात दोन्ही हात पुढे करुन उभा असताना अजूनपर्यंत तुम्ही बेडया घातल्यात नाही याचंच मला आश्चर्य होतंय हो चला आटपा लवकर. मला फार भूक लागली आहे. जेलमध्ये जातांच अगोदर पोटभर जेवणार आहे मी (इन्स्पेक्टर) बेडया घालतात) अच्छा शालू ( ती गहिवरते ) येतो मी. आजपासून स्वर्गाचा प्रवास सुरु झाला माझा. माझ्या जाण्यानं दु:खी होऊ नकोस तू हसंत निरोप दे मला ( गहिवरत ) पण मला मात्र एक वाईट वाटतंय की तुझ्यासाठी यापुढे मी धावत येवू शकणार नाही. यापुढे तुलाच तुझं भवितव्य उभं करायला हवंय.

शालन : ( मिठी मारोत ) भय्या-भय्या आता कुठं रे मिळशील तू मला ?

त्रिकाळसिंग मी दरोडेखोर असलो, खुनी असलो तरी माझ्यासाठी स्वर्गाचं दार उघड असणार – मी जे केलंय ते चांगल्यासाठी केलंय. तूही मागाहून चागलंच करणार आहेस. आणि म्हणूनच तुलाही स्वर्गाच दार उघडं असेल. तुझ्याआधी जरी मी जात असलो तरी शेवटी तुझी वाट पहात राहीन मी स्वर्गात, अच्छा येतो मी शालन माझ्या मागे या बंगल्यात सुखान रहा तू चला साहेब – ( साहेब त्याला घेऊन जातात ... शालन... "विक्राळभैय्याऽऽ" अशी आर्त किंकाळी मारुन खाली कोसळते ...

म. गं. म. ... शाखा.
न-ड-दा ...
नों. क्र. 9209
विषय
श्री साईनाथार्पणमस्तु 01/05/01 ... 76133

BVBK-0401200